# सृजन

सप्टेंबर - डिसेंबर २०२१




महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# मा. ऊर्जामंत्री ना.डॉ.श्री. नितीन राऊत यांचे शुभहस्ते चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र येथे कोळसा पाईप कन्व्हेयर प्रणाली लोकार्पण सोहळा संपन्न




क्षणचित्रे


























क्षणचित्रे





अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

## मनोगत

गेल्या सुमारे २ वर्षांपासून कोविड-१९ सारख्या वैश्विक आपत्तीचा मुकाबला करत असताना मनामनांवर साचलेले मळभ दूर करुन आपण सर्वजण नव्या वर्षात पदार्पण करताना आगामी नववर्षाच्या आपणा सर्वांना शुभेच्छा! मात्र नववर्षानिमित्त वैयक्तिक किंवा आस्थापनेच्या पातळीवर नवनवीन संकल्प करणे एवढेच पुरेसे नसून या संकल्पनांना मूर्त स्वरुपात साकार करण्यासाठी आपण बौध्दिक व परिश्रमाची जोड देणेही तितकेच महत्वाचे आहे. निव्वळ कागदावर वा मनातच राहणारे संकल्प बिनकामाचे ठरतात. तेव्हा सर्वप्रथम २०२२ या वर्षासाठी आपण सर्व महानिर्मिती परिवार संयुक्त संकल्प करुयात की आपल्या कंपनीच्या उज्ज्वल भविष्यासाठी - प्रगतीसाठी आपण आपापल्या स्तरावर प्रत्येक छोटा-मोठा प्रामाणिक प्रयत्न करुयात.

वीजक्षेत्रासाठी सध्याचा काळ विलक्षण स्थित्यंतराचा व आव्हानात्मक स्वरुपाचा असला तरीही आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे आपण गेल्या दीड-दोन वर्षांत उल्लेखनीय कामगिरी बजावू शकलो आहोत. गेल्या ६० वर्षांतील सर्वोच्च वीजनिर्मितीचा उच्चांक असो, पावसाळ्यातील कोळसाटंचाईवर मात करत साध्य केलेली सातत्यपूर्ण वीजनिर्मिती असो, महानिर्मितीने कोविड-१९ आपत्तीच्या काळात वीजग्राहकांची अखंड अहर्निश सेवा केलेली आहे. या वर्षी पावसाळ्यातील अतिवृष्टीमुळे विविध कोळसा पुरवठादार कंपन्यांकडून कोळसा उत्खनन व वहन यांत काही समस्या निर्माण झाल्यानंतर संपूर्ण देशात कोळसाटंचाईचे जणू अभूतपूर्व संकट उभे राहिलेले होते. तथापि, अशाही परिस्थितीत आपल्या राज्याला भारनियमनाचे संकट सहन करावे लागू नये यासाठी महानिर्मितीने फार मोलाची भूमिका बजावली. उत्तम इंधन व्यवस्थापनाचे माध्यमातून आणि उत्तमोत्तम कार्यसंस्कृतीशी त्याची सांगड घालून आपण कोळसाटंचाईतही आपल्या वीज उत्पादनावर फारसा परिणाम होऊ दिला नाही. शिवाय वीजनिर्मिती अधिकाधिक किफायतशीर कशी होईल याकडे कटाक्षाने लक्ष दिल्याने आपले बहुतांशी संच मेरिट ऑर्डर डिस्पॅचनुसार कार्यरत राखण्यातही आपल्याला या काळात यश मिळाले. कोळसाटंचाईच्या काळात विजेच्या बाजारातील चढ्या दरांच्या तुलनेत महानिर्मितीने अतिशय रास्त दराने वीजनिर्मिती साध्य केली, हे उल्लेखनीय आहे.

अशीच उत्तम कामगिरी यापुढील काळातही साध्य व्हावी यासाठी नियोजनाच्या पातळीवर आपण अगदी वास्तववादी व शास्त्रशुध्द पध्दतीने काही कृती आराखडा आखला आहे. तसेच 'व्हिजन २०३०' हे लक्ष्य ठेवून आपण आणखी १० वर्षांनी विजेची जी वाढती मागणी असणार आहे ती लक्षात घेऊन त्यानुसार कार्यवाही करणार आहोत. अर्थात, ही कार्यवाही करण्यासाठी मी खाली नमूद केल्याप्रमाणे माझ्या एका त्रिसुत्रीला अधोरेखित करु इच्छितो.

१) **अद्ययावत तंत्रज्ञानाचा स्वीकार व वापर करुन कार्यक्षमता वाढविणे** या अंतर्गत वीजनिर्मिती केंद्राचे संचलन व सुव्यवस्था राखताना उत्तमोत्तम कार्यसंस्कृती जोपासणेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, उष्माकांत सुधारणा आणि स्थापित क्षमतानिहाय पूर्ण क्षमतेने वीजनिर्मिती, प्रभावी इंधन व्यवस्थापन, संयंत्रांना लागणाऱ्या विजेच्या प्रमाणात बचत, मनुष्यबळ व यंत्रसामुग्री यांची सुरक्षितता-प्रतिबंधक उपाययोजना करणे जरुरीचे आहे.

२) **पर्यावरणीय बाबींचे संवर्धन (कार्बन फूटप्रिंट - कर्बवायु उत्सर्जन कमी करणे.)** या अंतर्गत आपापल्या वीजकेंद्रातून कार्बनचे उत्सर्जन शून्य पातळीवर आणण्याचा प्रयत्न करणे, नवीन व नवीकरणीय अपारंपारिक ऊर्जास्त्रोतांना प्रोत्साहन देऊन कर्बवायुचे उत्सर्जन नियंत्रित करणे, तीन 'R'चा प्रभावी अवलंब (Reduce, Reuse & Recycle), पाण्याचा पुनर्वापर करुन पाण्याच्या वापरात बचत, ऊर्जा संवर्धन व ऊर्जा अंकेक्षण कार्यक्रम सर्व पातळीवर राबविणे, वीजकेंद्र परिसरात हरित पट्ट्याचे विकसन करणे, कामाच्या ठिकाणी कर्मचाऱ्यांसाठी सुदृढ पर्यावरणपूरक वातावरण निर्माण करणे, या बाबी समाविष्ट आहेत.

**३) स्थापित क्षमतावाढ व ऊर्जाविषयक तज्ञ सेवा आणि सल्ला** या अंतर्गत मुख्यत्वे नवीन प्रकल्पांद्वारे क्षमतावाढीचे नियोजन - सौर, जल, औष्णिक, वायु व संकरित ऊर्जा, व्यवसायिक कक्षा रुंदावणाऱ्या ऊर्जाक्षेत्रातील अन्य संधीचा शोध / मागोवा घेणे. अपारंपारिक ऊर्जा, विजेची साठवण करणाऱ्या बॅटरीचे तंत्रज्ञान, स्पर्धात्मक बाजार, विजेचा व्यापारातील प्रभावी सहभाग, महानिर्मितीच्या अनुभवी, कुशल मनुष्यबळाचा सल्लागार म्हणून प्रभावी वापर करुन घेणे इ. बाबी येतात.

थोडक्यात, वीज क्षेत्रात पाय रोवून टिकून राहायचे असेल तर या त्रिसुत्रीनुसार उपरोक्त सर्व बाबींचा अंगिकार करणे, ही अपरिहार्य बाब ठरणार आहे. अपारंपारिक ऊर्जेला आगामी काळात उज्ज्वल भविष्य असले तरीदेखील पुढील किमान १०-१५ वर्षे तरी औष्णिक वीजनिर्मितीचे महत्व वादातीत राहणार आहे. आपली औष्णिक स्थापित क्षमता हे महानिर्मितीचे बलस्थान असून आगामी १०-१५ वर्ष ते तसेच अबाधित टिकवायचे आहे. त्याचबरोबर भविष्यकाळ हा अपारंपारिक ऊर्जेचाच असून नवनवीन तंत्रज्ञान विकसित होणार असून त्यामुळे या सध्याच्या स्थित्यंतरास 'संधी' समजून तिचे सोने करण्यास आपण तयार असले पाहिजे. थोडक्यात वीजक्षेत्रातील स्पर्धेला 'संकट' समजण्याऐवजी 'संधी' म्हणून आपण दूरदृष्टीने त्याकडे बघितले तर या क्षेत्रात महानिर्मितीची प्रगती उत्तमोत्तम होणार हे निश्चित.

**- संजय खंदारे**

## मुख्यालय, प्रकाशगड येथे कार्यकारी संचालक (सौर व सां.नि.सु.) मा.श्री. कैलास चिरुटकर यांचा सेवानिवृत्ती समारंभ संपन्न







दि. ३० नोव्हेंबर २०२१ रोजी मुख्यालय, प्रकाशगड येथे कार्यकारी संचालक (सौर व सां.नि.सु.) मा.श्री. कैलास चिरुटकर यांचा सेवानिवृत्तीप्रित्यर्थ सपत्नीक सत्कार करण्यात आला. त्यावेळी संचालक (संचलन) मा.श्री. चंद्रकांत थोटवे, संचालक (माईनिंग) मा.श्री. पुरुषोत्तम जाधव, संचालक (प्रकल्प) मा.श्री. व्ही. थंगपंडियन, संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी, महिला कर्मचारी उपस्थित होते.
यावेळी मान्यवरांनी श्री. चिरुटकर यांना शाल, श्रीफळ आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.
तसेच अधीक्षक अभियंता सौ. वैशाली पाटील यांनी सौ. चिरुटकर यांचे स्वागत केले. त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.








## दुबई एक्स्पो २०२० मध्ये महानिर्मितीचा सहभाग











महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

वर्ष १६ वे (अंक ३)
सप्टेंबर - डिसेंबर २०२१

# Maharashtra State Power Generation Company Limited
## SEPTEMBER - DECEMBER - 2021

**संचालक मंडळ**

| | |
|---|---|
| अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक | : श्री. संजय खंदारे (भाप्रसे) |
| संचालक | : श्री. दिनेश वाघमारे (भाप्रसे) |
| संचालक (संचलन) | : श्री. चंद्रकांत थोटवे |
| संचालक (माईनिंग) | : श्री. पुरुषोत्तम जाधव |
| संचालक (प्रकल्प) | : श्री. व्ही. थंगपांडियन |
| संचालक (वित्त) | : श्री. बाळासाहेब थिटे |
| संचालक | : श्रीमती. स्वाती व्यवहारे |

संपादक : **महेश आफळे**
जनसंपर्क अधिकारी (महानिर्मिती)

## अनुक्रमणिका

| अनुक्रमणिका | लेखक / लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|
| सुरक्षित आणि निरोगी भविष्यासाठी परिसंस्था पुनर्संचयित करण्याची मानवाची भूमिका | तेजस पवार | ३ |
| घोड्याचे दु:ख | डॉ. अतुल बनसोड | ७ |
| अशय सोशल ग्रुप - पर्यावरणसंवर्धन संस्था | सीमा खंडाळे | ९ |
| आपले कुटुंब सहकारी आपलीच जबाबदारी | राजेश लक्ष्मण वऱ्हाडे | १३ |
| बरं झालं कोरोना आला... | मारुती निवृत्ती जाधव | १८ |
| सजावट | संतोष पुरोहित | १९ |
| आयुष्य... एक प्रवास - एका वाटेवरचा | संजय कुलकर्णी | २२ |
| An Overview of Condensate Polishing Unit | Vivek Ghodmare | २४ |
| दुबई एक्स्पो... एक अविस्मरणीय अनुभव | अभय हरणे | २५ |
| Induction of Advanced Firefighting Vehicles... | Shashikant Papade | २६ |

**काव्यकुंज**
१४ ते १७
**सहभाग :-** आशिष ईखनकर, राजेश वऱ्हाडे, अमोल कांबळे, योगेश कापडणीस, प्रवीण भोईर, दिनेश पवार.

**सेवानिवृत्ती / निरोप** १२
**महानिर्मितीचे कर्मयोगी / आपण यांना अंतरलो** १२

**प्रशासकीय वृत्त**
**पृष्ठ क्र. : ५ ते ८, ११ ते १३, १८ ते २१, २३, २८**

संपादन सहाय्य : **संतोष पुरोहित**

**मालकी**
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या.
प्रकाशगड, वांद्रे, मुंबई

श्री. महेश गोविंद आफळे यांनी
कार्यालय - **हेमा आर्टस्**
१२१, सागर, प्रभात इंडस्ट्रीयल इस्टेट,
दहिसर चेकनाक्याजवळ, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे,
दहिसर (पूर्व), मुंबई - ४०००६८ येथे छापून
प्रकाशगड, वांद्रे, मुंबई येथे प्रसिध्द केले.

**(खाजगी वितरणाकरिता)**

***The Company accepts no responsibility for the matter published in the Journal.***

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**
संपादक, सृजन
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित,
दुसरा मजला, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : pro@mahagenco.in
संकेतस्थळ : www.mahagenco.in

# संपादकीय....

सृजन गृहपत्रिकेच्या माध्यमातून गेली सुमारे १७ वर्षे आपणा सर्वांशी वेळोवेळी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संपर्क येत गेला आणि आपण आजवरच्या प्रवासात दिलेल्या सहकार्यामुळेच 'सृजन' अंकाचा दर्जा राखण्यात मदत झाली हे अगदी खरे आहे. तथापि, बदलत्या काळात विशेषत: समाजमाध्यमांच्या वाढत्या वापरामुळे या मुद्रित माध्यमाची उपयुक्तता कमी होताना स्पष्ट दिसत आहे. क्षेत्रीय कार्यालयांकडून पुरेसा प्रमाणात बातम्या, लेख प्राप्त होत नसल्याने 'सृजन' च्या आगामी वाटचालीवर प्रश्नचिन्ह उमटताना दिसत आहे, हे खेदाने नमूद करावेसे वाटते. वस्तुत: 'सृजन' गृहपत्रिका हा महानिर्मितीच्या अखंड प्रवासाचा एकप्रकारे अधिकृत दस्तऐवज आहे हे मागेच नमूद करुन झाले आहे. अनेक नवनवीन लेखक-कलावंत घडविण्याचा प्रयत्न 'सृजन' च्या माध्यमातून आम्ही आमच्या परीने करीत आहोतच. आगामी काळात क्षेत्रीय कार्यालयांची अनास्था अशीच राहिली तर नाईलाजाने हा उपक्रम सुरु ठेवणे अवघड होऊ शकेल अशी एकंदरीत आजतरी परिस्थिती आहे.

'सृजन' च्या या अंकात मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी वीजक्षेत्रातील भविष्यकालीन आव्हानांचा नेमका वेध घेताना 'औष्णिक वीजनिर्मिती' या आपल्या बलस्थानाचा प्रभावी उपयोग करण्यासाठी आपल्याला प्रेरणादायी आवाहन केले आहे. या संकल्पांना आपणां सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांची-परिश्रमाची जोड मिळावी ही अपेक्षा.

या अंकातील पर्यावरणीय विषयक दोन लेखांचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. तेजस पवार व सीमा खंडाळे यांच्या लेखातून पर्यावरणीय बाबींकडे दुर्लक्ष करण्याची स्वाभाविक मानवी प्रवृत्ती व त्या अनुषंगाने सुधारणांची निकड नेमक्या शब्दांत परखडपणे अधोरेखित केली आहे. कोरोना वैश्विक आपत्तीमुळे 'पर्यावरण संवर्धन' हा शब्द अग्रक्रमाने ऐरणीवर आलेला आहेच.

काव्य विभागातील कवितांसाठी मात्र अजूनही नवनवीन कवींना भरपूर वाव आहे.

इंग्रजी विभागातील दोन्ही लेख महत्वाचे असून वीजकेंद्राच्या संचलनासाठी खूप उपयुक्त आहेत. 'केंद्र शासन व राज्य शासन' यांच्या निर्देशानुसार स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याने त्या निमित्ताने 'आजादी का अमृत महोत्सव' चे औचित्य साधून विविध प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करीत आहोत. महानिर्मितीच्या वतीने कर्मचाऱ्यांसाठी निबंध स्पर्धा / पथनाट्य - प्रहसन स्पर्धा तसेच सर्व जनसामान्यांसाठीदेखील खुल्या राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. त्यात माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा / अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा व लघुपट स्पर्धा यांचा समावेश आहे. महानिर्मितीच्या प्रतिमासंवर्धनास उपयुक्त अशा या स्पर्धा यशस्वी करणेसाठी आपणां सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

**- महेश आफळे**

# सुरक्षित आणि निरोगी भविष्यासाठी परिसंस्था पुनर्संचयित करण्यासाठी मानवाची भूमिका


**– तेजस पवार**

सहाय्यक अभियंता,
भुसावळ औ.वि. केंद्र







दि. १७ ऑक्टोबर २००९, समुद्राच्या पाण्यामध्ये ५ मीटर खोल जाऊन ३० मिनिटांची जगातील पहिली कॅबिनेट मिटींग मालदीव या देशाने घेतली होती. ज्यामध्ये मालदीवचे तत्कालीन राष्ट्रपती, उपराष्ट्रपती व ११ मंत्री सहभागी होते. त्या कॅबिनेट मिटींगमध्ये काही दस्ताऐंवजावर सह्या करण्यात आल्या, अर्थातच वॉटरप्रूफ पेन व पेपरचा उपयोग करुन. साहजिकच प्रश्न पडेल की, समुद्राच्या पाण्यामध्ये जाऊन अशाप्रकारे कॅबिनेट मिटींग का घेतली असावी? याचं उत्तर मालदीवचे तत्कालीन राष्ट्रपती मोहम्मद नशीद यांनी त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत दिलं होतं. मालदीव या देशाची सरासरी समुद्रसपाटीपासूनची उंची फक्त १.८ मीटर इतकी आहे. पर्यावरणातील मानवी हस्तक्षेपामुळे जागतिक तापमानवाढीची समस्या निर्माण होऊ लागली आहे. त्याचा परिणाम समुद्रातील पाण्याची पातळी वाढण्यात होत आहे. उपग्रहांनी मिळविलेल्या माहितीनुसार मालदीव येथील समुद्रातील पाण्याची पातळी दरवर्षी ३.२ मिलिमीटरने वाढत आहे. जागतिक तापमानवाढीची समस्या अशीच राहिली तर २१०० वर्षाआधीच मालदीवचा संपूर्ण भूप्रदेश पाण्याखाली जाण्याची भीती आहे. जागतिक तापमानवाढीच्या या समस्येकडे जगाचे गांभीर्याने लक्षं जावं तसेच आपण आज मालदीवला पाण्याखाली जाण्यापासून वाचवू शकलो नाही तर येणाऱ्या काळात इतर अनेक प्रदेश पाण्याखाली जातील, याची जाणीव करुन देण्यासाठी अशा प्रकारची आगळीवेगळी कॅबिनेट मिटींग घेण्यात आली होती. पर्यावरण समृध्द करणाऱ्या कित्येक परिसंस्था आज अशाप्रकारे धोक्यात आल्या आहेत.

तापमानवाढीमुळे जंगल वणव्यांचा अक्षरश: कहर सुरु आहे. २०२०च्या आरंभी ऑस्ट्रेलियातील १ कोटी १२ लाख हेक्टरवरील अरण्यवणव्यात ७० मीटर उंचीचा आगलोळ शेकडो किलोमीटरवर दिसत होता. १०० कोटी वन्यजीवांची आहुती देणारं हे अग्नितांडव १३० दिवस चालू होतं. हवाई, नाविक व सैन्यदलाचे तसेच अग्निशमन दलातील निष्णात जवान असे १०,००० जणांचे मनुष्यबळ भल्यामोठ्या पाणीसाठ्याची वाहने जमीन व हवेतून पाण्याचा मारा करीत होते. मानवी पराकाष्ठेला दाद न देणारा हा अरण्यवणवा पाऊस आल्यानंतरच शमत गेला. अशाच प्रकारे कॅलिफोर्निया, ॲमेझॉन व सैबेरियातील अरण्यात अग्नितांडव पाहायला मिळालं होतं. यादरम्यान किती पक्षी-प्राणी आणि त्यांचे अधिवास नष्ट झाले असतील याची गणती नाही. परिसंस्थांचा अशाप्रकारे होणारा ऱ्हास हा वरवर जरी नैसर्गिक आपत्तींमुळे वाटत असला तरी या नैसर्गिक आपत्तींच्या मुळाशी मानवाच्या निसर्गावरच्या आक्रमणामुळे निर्माण झालेल्या समस्याच आहेत. हवा प्रदूषणामुळे आरोग्य आणि अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम तितकाच गंभीर आहे. स्वित्झर्लंडमधील आयक्यु-एअर या संस्थेने हवेच्या दर्जाबाबत तयार केलेल्या अहवालात जगातील सर्वाधिक ३० प्रदूषित शहरांमध्ये २२ शहरे एकट्या भारतात आहेत. दळणवळणाच्या सुविधेसाठी मोठ्या प्रमाणात होत असलेली वृक्षतोड ही हवा प्रदूषण वाढीस हातभार लावत आहे. हवा प्रदूषणाप्रमाणेच जल प्रदूषणास वाढतं शहरीकरण आणि औद्योगिकरण कारणीभूत ठरत आहे. केवळ मानवी जीवनच नाही तर संपूर्ण सजीव सृष्टीचं जीवन आज हवा-जल-ध्वनी प्रदूषणाने व्यापून टाकले आहे. हवामान बदलामुळे गेल्या काही काळात अकाली पाऊस, ढगफुटी, चक्रीवादळे, दुष्काळ यांसारखे तडाखे वरचेवर वाढत चालले आहेत. अशा नैसर्गिक आपत्तींमुळे परिसंस्थांना धोका निर्माण होत असतो. त्यामुळेच परिसंस्था पुनर्संचयित करण्याच्या दृष्टीने सुरक्षित व निरोगी भविष्यासाठी मानवाने सामुहिक तसेच वैयक्तिक पातळीवरही काही ठाम, शाश्वत व सातत्यपूर्ण भूमिका घेणं अत्यंत गरजेचं आहे.

परिसंस्था पुनर्संचय (Ecology Restoration) ही यंदाच्या ५ जून – जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना आहे. यजमानपदी पाकिस्तान असून या संकल्पनेद्वारे प्रदूषण व वृक्षतोडीसारख्या मानवी हस्तक्षेपामुळे धोक्यात असलेल्या परिसंस्थांचं संवर्धन करण्यावर विशेष लक्ष दिलं जाणार आहे. इतकंच नव्हे तर संयुक्त राष्ट्राने २०२१ ते २०३० हे संपूर्ण दशकच परिसंस्था पुनर्संचयित करण्यासाठी समर्पित केलं आहे. त्यामध्ये अनेक महत्वाची उद्दिष्ट्ये संपूर्ण जगाला दिलेली आहेत. त्यानुसार, २०३० पर्यंत ३५० लाख हेक्टर भूपृष्ठीय व जलीय परिसंस्थेच्या पुनर्संचयाने ६३० लाख कोटी रुपयांचे मूल्य असलेल्या परिसंस्थीय सेवा मिळवणं तसेच १३ ते २६ गिगा टन हरितगृह वायुंचे प्रमाण कमी करण्याचे ध्येय आहे. यामध्ये उल्लेख केलेल्या ध्येयामुळे गुंतवणूकीच्या ९ पटीने जास्त फायदा होईल आणि समजा असा कोणताही प्रकल्प या दशकात हाती न घेतल्यास होणारं नुकसान हे तीन पटीने जास्त असेल, असा इशारा संयुक्त राष्ट्राच्या पर्यावरण कार्यक्रमाने (UNEC) दिला आहे. हवामान बदलावर नियंत्रण ठेवण्यासाठी जागतिक पातळीवर पॅरिस करार २०१५ साली करण्यात आला आहे. पृथ्वीचं वाढत जाणारं तापमान १.५° सेल्सिअसपर्यंत रोखण्यासाठी जवळपास १९० पेक्षा

जास्त देशांनी प्रयत्न करण्याचं ठरवलं आहे. पण अमेरिकेसारख्या महासत्तेनं त्यातून बाहेर पडणं आणि सत्तांतरानंतर पुन्हा सहभागी होणं, यामुळे या कराराच्या परिणामकारकतेत सातत्याचा अभाव दिसून येत आहे.

आपल्या देशानेही हवामानबदलावर नियंत्रणासाठी सौर ऊर्जेला प्राधान्य देण्याची भूमिका घेतली आहे. पण तरीही आपल्या देशातही पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने धोरणात्मक सातत्य दिसत नाही. मागच्या वर्षी जाहीर केलेला पर्यावरण परिणाम मूल्यांकन-२०२० चा मसुदा देशभरातील जंगले व जनतेच्या मुळावर (आरोग्याच्या दृष्टीने) उठला आहे. या नव्या पध्दतीमुळे उद्योग व प्रकल्पांना परवानगी देताना पर्यावरण क्षेत्रातील तज्ज्ञांकडून प्रस्तावित जागेची पाहणी करण्याची आवश्यकता सुध्दा असणार नाही. नव्या मसुद्यानुसार, आता आधी प्रकल्प व उद्योगाची उभारणी होईल व नंतर वर्षभरानंतर त्याचा पर्यावरणावर काय परिणाम होईल, याची चर्चा केली जाईल. तसेच जनतेच्या आरोग्यावर काय परिणाम होता याचेही मूल्यांकन या नव्या प्रणालीनुसार नंतरच होईल. अशावेळी मूल्यांकनानंतर प्रकल्पाचे दुष्परिणाम दिसून आल्यास प्रकल्प उभारणीवेळी झालेली वृक्षतोड व त्या आधारे नष्ट झालेला पक्षांचा अधिवास हे सारे कसे काय परत आणणार? विकास की पर्यावरण या जुन्यापुराण्या सापळ्यासाठी तत्कालिक व वेचिव आर्थिक फायदे दाखवून प्रकल्प मार्गी लावले जातात. परंतु, मंजुरी देताना त्या ताळेबंदात संभाव्य आपत्तींच्या हानीचं मापन केलं तर प्रकल्पांचं टिकाऊपण ध्यानात येईल.

मध्यंतरी महाराष्ट्र सरकारने प्लॅस्टिकबंदी जाहीर केली होती. खरंतर, दंडाच्या भीतीपेक्षा लोकांना प्लॅस्टिकमुळे होणाऱ्या पर्यावरणाच्या ऱ्हासाची जास्त चिंता वाटली पाहिजे. पण वास्तवात, तेवढं सामाजिक व पर्यावरणीय भान आपल्याकडे नाही. म्हणूनच कोणत्याही सुधारणा अनेकदा हेकेखोरपणे, हट्टाने रेटाव्या लागतात. समाज स्वत:ची सोय सोडायला कधीच राजीखुशीने तयार होत नसतो. किंबहुना तो तयार होईल तेव्हाच त्या सुधारणा करु, असे म्हणणे म्हणजे पर्यावरणाच्या बाबतीत तरी आत्मघातकी विचार असतो. मोठा गाजावाजा करीत केलेली प्लॅस्टिकबंदी सुरुवातीचा काळ सोडला तर अंमलबजावणी बाबतीत जनतेच्या बेदरकारपणामुळे व स्वयंशिस्तीच्या अभावामुळे इतकी निष्क्रिय झाली की, आज महाराष्ट्रात प्लॅस्टिकबंदी अस्तित्वात आहे की नाही असा प्रश्न पडावा जशी परिस्थिती आहे. त्यामुळे परिसंस्था पुनर्संचयाच्या बाबतीत प्रयत्न करताना व्यवस्थेच्या पातळीवर धोरणात्मकरित्या सातत्य असायला हवे. आजही अनेकांना विकास व पर्यावरण या दोन वेगवेगळ्या गोष्टी वाटतात. पण पर्यावरणपूरक विकास या नव्या संकल्पनेचा आग्रह धरुन त्यानुसार व्यवस्थात्मक पातळीवर धोरण ठरवले जाणे आवश्यक आहे.

परिसंस्था पुनर्संचयासाठी व्यवस्थात्मक व सामूहिक पातळीवरच्या प्रयत्नांइतकेच वैयक्तिक पातळीवरचे प्रयत्न महत्वाचे आहेत. अमेरिकन लेखिका व पर्यावरणतज्ज्ञ राशेल कार्सन यांनी, "माणूस हा निसर्गाचाच एक भाग आहे. त्याचं निसर्गाशी युध्द हे अटळपणे स्वत:च्याच विरोधातील आहे." असं नमूद केलं आहे. त्यामुळे स्वत:च्या विरोधातील हे युध्द थांबवायचं असेल तर प्रत्येकाने पर्यावरणपूरक जीवनशैली आत्मसात करणं आवश्यक आहे. दैनंदिन आयुष्यात ऊर्जेच्या बाबतीत कार्यक्षम असलेली ५ स्टार रेटिंग उपकरणे, एल.ई.डी. बल्ब तसेच सौर ऊर्जेवर आधारित उपकरणे यांचा वापर वाढविण्यासोबतच आपल्या परंपरा, सण-समारंभ यांच्याकडेही चिकित्सेने बघणे आवश्यक होऊन बसले आहे. गणेशोत्सवात गणेशमूर्ती पर्यावरणास हानीकारक असलेल्या विविध रासायनिक रंगांच्या वापरण्याऐवजी पर्यावरणपोषक (Eco-friendly) गणेशमूर्ती यांचा स्वीकार करणे किंवा रासायनिक रंगांच्या गणेशमूर्तींचं विसर्जन सार्वजनिक तलावात, नदीत, समुद्रात न करता मूर्तीदान करणे किंवा प्रतिकात्मक विसर्जन केल्यास पर्यावरण संवर्धनाच्या व परिसंस्था पुनर्संचयाच्या दृष्टीने ते नक्कीच पुढचं पाऊल ठरेल. त्याचप्रमाणे होळीच्या सणाला एरंडाच्या झाडाची पूजा करुन ते जाळणे, दसऱ्याला आपट्याची पाने तोडून ती सोनं म्हणून एकमेकांना वाटणे व दुसऱ्या दिवशी ते सर्व कचऱ्यात टाकणे आणि दिवाळीला-नववर्षांच्या स्वागताला फटाके फोडणे या परंपराकडे कधीतरी आपण चिकित्सेने बघणार आहोत की नाही? हवा प्रदूषण नवनवीन उच्चांक गाठत असताना दिवाळीला-नववर्षावेळी फटाके फोडणे, हे पर्यावरणाच्या दृष्टीने आपणां सर्वांपुढे भविष्यात गंभीर आव्हान निर्माण करणार आहे, याकडे सर्वांनीच लक्ष देणे आवश्यक आहे. खरंतर, कोणताही सण-उत्सव हा स्वकीयांना - आप्तजनांना - मित्रपरिवाराला भेटून आनंद साजरा करण्याचं प्रयोजन असतो. पण प्रचंड मोठ्या आवाजाचे फटाके लावून ते फुटताना कानावर हात ठेवणे, यात कसला आलाय आनंद? याचा कधीतरी विचार होणं आवश्यक आहे. निदान फटाक्यांच्या आवाजाने लहान मुले, वृध्द व प्राणीमात्रांवर होणारे दुष्परिणाम तरी विचारात घेणं आवश्यक आहे. सण-समारंभावर, परंपरेवर चिकित्सात्मक दृष्टीकोनातून मांडणी केल्यानंतर व्यक्तिस्वातंत्र्यावर बंधने आणल्याचा आरोप केला जातो. पण अशा पध्दतीने प्रदूषण केल्यामुळे इतरांच्या सुरक्षित व निरोगी वातावरणात जगण्याच्या स्वातंत्र्यावर बंधन आणतोय, हे मात्र आपण विसरत असतो.

'नागरिकांची पर्यावरणसंबंधीची अनास्था' हे जगभरातील पर्यावरणतज्ज्ञांना पडलेलं एक कोडं आहे. केंब्रिज विद्यापीठातील 'हवामान व संस्कृती' विषयाचे प्राध्यापक माइक ह्युम म्हणतात, सामान्य व्यक्तीला पर्यावरण विनाश व हवामान बदल या समस्या आपल्या वाटतच नाहीत. उलट, त्या दूरच्या, अनाठायी व क्षुल्लक वाटतात. याचं कारण व्यक्तीच्या स्वभावात किंवा स्थायीभावात (Inertia) दडलेलं आहे. आपल्या स्वभावानुसार, मनातील आयुष्याविषयीच्या कल्पना, मूल्ये व उद्देश ठरतात. त्यातून आपला जगाकडे पाहण्याचा दृष्टीकोन ठरतो. आपलं वर्तन व कृती यांचं मूळ तिथं खोलवर रुजलेलं असतं. हे अगदी नेमकं व वास्तववादी विश्लेषण म्हणावं लागेल. अगदी सुशिक्षित पालकही आपल्या पुढच्या पिढीला पर्यावरणवादी जाणिवा जागृत करण्यासाठी मूल्य विकसित करण्यासाठी काही प्राथमिक प्रयत्न करत असल्याची उदाहरणे खूप दुर्मिळ असतात. परिसंस्था पुनर्संचयाच्या दृष्टीने आपल्यासोबत इतरांच्या पर्यावरणासंबंधी जाणिवा प्रगल्भ करणे व त्याची अंमलबजावणी खूप आवश्यक आहे. मोठ्या मोठ्या प्रकल्प व उद्योगांसाठी केली जाणारी वृक्षतोड, सातत्याने वाढतं कर्बउत्सर्जन व त्याचे परिणाम, हवेचं प्रदूषण, पिण्यासाठी स्वच्छ पाणी यासाठी लोक आग्रही नसल्याने या समस्या राजकीय पटलावर येतच नाहीत. परिणामी, पर्यावरण व हवामान बदल हे विषय राजकीय

अनास्थेचे ठरतात. म्हणूनच अगदी कोणत्याही पक्षाच्या जाहीरनाम्यात पर्यावरणासंबंधी एक वाक्यही नसतं, ही आपल्या राजकीय व्यवस्थेची, जनतेची व पर्यावरणाची सुध्दा मोठी शोकांतिका आहे.

आजवर मानवी वसाहतींचा व समृध्द संस्कृतींचा विकास नजीकच्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या पाण्याच्या स्त्रोतामुळेच झाला आहे. म्हणूनच प्रत्येक महत्वाचं व प्रगत शहर कोणत्या ना कोणत्या नदीच्या काठावर पाहायला मिळतं. पण आज देशातील बहुसंख्येने मोठ्या नद्या प्रदूषणग्रस्त बनल्या आहेत. त्यामुळेच देशात युध्दपातळीवर नदी शुध्दीकरण मोहिम हाती घेण्याची गरज आहे. केंद्र सरकारने मागच्या काही वर्षांपूर्वी प्रत्येक खासदाराने तीन गांवांना दत्तक घेऊन तिथे भौतिक व पायाभुत सुविधा ५ वर्षांत सांसद आदर्श ग्राम योजनेतून विकसित कराव्यात अशी महत्वाकांक्षी योजना हाती घेतली होती. अंमलबजावणी पातळीवर या योजनेला तितकंसं यश आलं नव्हतं. पण कल्पना अतिशय सृजनशील होती. त्यामुळे त्याच धर्तीवर ५ खासदार व १० आमदारांच्या एका गटाने एक नदी निवडून त्या नदीचं शुध्दीकरण करण्याची मोहिम हाती घेतली तर कित्येक नद्यांना नवसंजीवनी मिळून जलीय परिसंस्था पुनर्संचयित होतील. किमान निवडलेल्या नदीमध्ये घातक रासायनिक पदार्थ, सांडपाणी प्रक्रिया न करता मिसळलं जाणार नाही, याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली तरी नदी प्रदूषण कमी होण्यास मोलाची मदत होईल. थोडक्यात काय तर, गंगा नदीला एकवेळ गंगा माँ, गंगा मैय्या, पवित्र गंगा, वगैरे वगैरे म्हटलं नाही तरी चालेल पण निदान कोरोनामुळे झालेले मृतदेह गंगा नदीत टाकण्याचे अघोरी प्रकार तरी करु नयेत. यामुळे पर्यावरणाची किती पटीने हानी होत असेल याची कल्पनाच करवत नाही.

"The greatest threat to our plantet is the belief that someone else will save it.", पर्यावरणतज्ञ रॉबर्ट स्वॅन यांचं हे वाक्य अतिशय मार्मिक आहे. पर्यावरणाच्या होत असलेल्या ऱ्हासाची जाणीव असलेले संवर्धनासाठी तितकेसे सक्रिय नाहीत आणि सर्वात महत्वाचं व धक्कादायक म्हणजे पर्यावरण ऱ्हासाची जाणीव नसलेले बहुसंख्येने आहेत. म्हणूनच आर्थिक हितसंबंध गुंतलेल्या लोकांकडून पर्यावरणातील नोबेल समजला जाणारा टायलर पारितोषिकेचे मानकरी व ज्येष्ठ पर्यावरणशास्त्रज्ञ माधव गाडगीळ यांना धमकीचे फोन जातात, सामाजिक कार्यकर्त्या व पर्यावरणवादी मेधा पाटकर यांना विकासविरोधी ठरवलं जातं, दिल्लीत प्रदूषणाच्या सर्व मर्यादा ओलांडल्या गेल्याने फटाकेबंदी करणाऱ्या सुप्रीम कोर्टाच्या बाहेरच काही लोकांकडून या निर्णयाचा विरोध म्हणून फटाके फोडले जातात आणि गंगा नदीच्या प्रदूषणाकडे लक्ष वेधण्यासाठी १११ दिवस सलग उपोषण करणाऱ्या व नंतर मृत्युमुखी पडलेल्या पर्यावरणवादी प्रा.जी.डी. अग्रवाल यांची साधी दखलही व्यवस्थेकडून घेतली जात नाही. म्हणूनच सुरक्षित व निरोगी भविष्यासाठी परिसंस्था पुनर्संचयित करण्यासाठी मानवाने व्यवस्थात्मक, सामूहिक व वैयक्तिक पातळीवर ठाम भूमिका घेऊन अंमलबजावणी पातळीवर सक्रिय राहायला हवं. नाहीतर, पर्यावरण कार्यकर्ती ग्रेटा थर्नबर्गच्या वादग्रस्त टूलकिटचीच चर्चा होत राहील, पण तोपर्यंत आपण सर्वजण तिनेच सांगितलेल्या पॉईंट ऑफ नो रिटर्न पर्यंत पोहोचलेले असू.

******

## कोरोना कालावधीमध्ये घाटघर जल विद्युत केंद्राची उल्लेखनीय कामगिरी

महाराष्ट्राच्या निसर्गरम्य दरीखोऱ्यातून वाहणाऱ्या असंख्य नदीनाल्यांच्या सौंदर्यात लपलेले तेज ओळखून ते महाराष्ट्राच्या विकासाच्या कामासाठी प्रकट करण्याच्या अथक प्रयत्नांचा महत्वाचा टप्पा म्हणजे घाटघर जल विद्युत केंद्र होय.

दिवसा नैसर्गिक उंचीचा वापर करुन जनित्राद्वारे वीजनिर्मिती करुन बाहेर पडणारे पाणी समुद्रात न जाऊ देता निम्न भागांतील धरणात साठवून रात्री कमी वीज वापराच्या काळात पुन्हा त्याच जनित्राचा वापर करुन वर उचलून घेण्याची अशी घाटघर जल विद्युत केंद्राची ओळख आहे.

कोरोना कालावधीमध्ये घाटघर जल विद्युत केंद्राने खालीलप्रमाणे विशेष उल्लेखनीय कार्ये पार पाडली :

१) दि. १८ फेब्रुवारी २०२० रोजी घाटघर जल विद्युत केंद्रातील युनिट क्र. १ व २ मधील हायड्रो कन्ड्युटमध्ये तीव्र स्वरुपाचे हंटिंग निरीक्षणात आले. त्यामुळे दोनही संच बंद करण्यात आले. दोन्ही संच पुन्हा कार्यान्वित करण्याकरिता दोन्ही संचाचे मुख्य इनलेट व्हॉल्व दुरुस्ती व इतर निगडीत कार्य युध्दपातळीवर सुरु करण्यात आली होती. परंतु, २०२० वर्षात कोविड-१९ विषाणूचा संसर्ग सर्व देशभर पसरल्यामुळे शासनाने दि. २३ मार्च २०२० पासून संपूर्ण देशभर लॉकडाऊन जाहीर केला. त्यामुळे कामाची गती मर्यादित होती. शासनाने जाहीर केलेल्या कोविड-१९ मार्गदर्शक तत्वाचे काटेकोरपणे पालन करण्यात आले आणि मनुष्यबळाच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड न करता कामे टप्प्याटप्प्याने नियोजितपणे राबविण्यात आली. संपूर्ण देशभर लॉकडाऊनमुळे स्थानिक बाजारपेठ पूर्णपणे बंद झाली होती आणि बऱ्याच कंपन्या किमान मनुष्यबळावर काम करीत होती. अशा परिस्थितीत तेथील कामगारांनी उपलब्ध संसाधनांचा वापर करुन विद्युतगृह पुन्हा कार्यान्वित करण्याकरिता युध्दपातळीवर काम केले.

२) निसर्ग चक्रीवादळामुळे घाटघर ज.वि. केंद्र परिसरात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. चक्रीवादळाने मोठमोठी झाडे मुळासकट उन्मळून पडल्याने विद्युत तारा व वसाहतीतील घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. खंडित झालेला वीजपुरवठा तुटपुंज्या साधनसामुग्री व कमी मनुष्यबळाच्या सहाय्याने युध्दपातळीवर काम करुन २४ तासांत पूर्ववत करण्यात आला.

३) दि. १२ ऑक्टोबर २०२० रोजी उदभवलेल्या मुंबई येथील ब्लॅक आऊटच्या संकटात घाटघर ज.वि. केंद्राने सतत १० तास वीजपुरवठा करुन मुंबई व उपनगर यांची विजेची कमतरता दूर करण्यात खारीचा वाटा उचलला.

४) दि. ९ मार्च २०२१ रोजी ६० वर्षांतील उच्चांकी १०,४४५ वीजनिर्मिती करण्यात महानिर्मिती यशस्वी झाली, त्यात घाटघर ज.वि. केंद्रातील दोनही संचांनी वीजनिर्मिती करुन यात मोलाचे योगदान दिले.

# कोरोना कालावधीमध्ये कोयना जल विद्युत केंद्राची उत्कृष्ट कामगिरी

मार्च २०२० पासून आपला देश आणि पूर्ण जगच कोरोनाच्या जागतिक संकटाशी अखंड लढत आहे. देशात संपूर्ण टाळेबंदी असताना देखील वीजनिर्मिती मात्र अखंडित सुरु होती. शिक्षण पध्दती व विविध कार्यालये सुध्दा वर्क फ्रॉम होम पर्याय वापरत होते. वैद्यकीय सुविधा मधील अत्यावश्यक सेवेत तर विजेचा निरंतर वापर होत आहे. ऑनलाईन शिक्षण, वर्क फ्रॉम होम तसेच अत्यावश्यक व आवश्यक कारखान्यांसाठी लागणारी वीज या सर्व बाबींचा विचार करता कोरोनाच्या ह्या जागतिक संकटाविरुध्दच्या युध्दासाठी वीज हे सर्वात महत्वाचे आयुध आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

त्याच अनुषंगाने कोयना जल विद्युत प्रकल्पाने २०२०-२१ या वर्षात कोरोनाशी लढत असतानाच केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने दिलेल्या निर्धारित लक्ष्यापेक्षाही (३,१६० दशलक्ष युनिट्स) जास्त अशी एकूण ३,१८४ दशलक्ष युनिट्स इतकी वीजनिर्मिती केली.

कोयना जल विद्युत केंद्रामध्ये आधीच अधिकारी व कर्मचारी यांची कमतरता असताना गेल्या वर्षभरात ७७ कोविड संक्रमित केसेस झाल्या व ५ कर्मचाऱ्यांचा मृत्यु झाला. विलगीकरण कालावधीत कर्मचाऱ्यांच्या कमी उपलब्धतेमध्ये सुध्दा अखंड वीजनिर्मिती करुन कोयना जल विद्युत प्रकल्पाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सकारात्मकतेचे दर्शन घडवले.

दिनांक ५ एप्रिल २०२० रोजी रात्री ९ वाजता ९ मिनिटांच्या कालावधीसाठी संपूर्ण देशामध्ये मा. पंतप्रधान यांच्या आवाहनानुसार प्रत्येक घरातील दिवे बंद करण्यात आले होते. अशावेळी विजेची मागणी व पुरवठा यामध्ये तोठी तफावत पडून ग्रीडमध्ये अस्थिरता येऊन ग्रीड बिघाडाची शक्यता होती. ह्या गोष्टीच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने पूर्ण ग्रीड बिघाडाची शक्यता गृहित धरुन तत्पूर्वीच हाऊस जनरेटर तयार करुन ठेवण्यात आला होता. रात्री ९ नतर जशी विजेची मागणी कमी होऊन फ्रिक्वेन्सी वाढत गेली तसे भारप्रेषक कळवा यांच्या मार्गदर्शनानुसार, लोड कमी करुन व ९ वाजून १० मिनिटांनंतर जशी विजेची मागणी वाढत जाऊन फ्रिक्वेन्सी कमी होत गेली तसे लोड वाढवत नेऊन अत्यंत अल्प कालावधीत ग्रीड स्थिर ठेवण्यात कोयना प्रकल्पाने अभूतपूर्व कामगिरी बजावली. कोयना ज.वि. केंद्रातील विद्युत जनित्रे ही मागणीपासून ९० सेकंदांमध्ये पूर्ण क्षमतेने वीज निर्मिती करु शकतात व त्यामुळेच विद्युत ग्रीडमध्ये होणारे चढउतार नियंत्रित करण्यासाठी या प्रकल्पाचे अनन्यसाधारण महत्व आहे आणि दि. ५ एप्रिल २०२० च्या घटनेमध्ये कोयना ज.वि. प्रकल्पाच्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी समन्वय व सहकाऱ्यांनी ग्रीडची स्थिरता अबाधित राखून हे महत्व अधोरेखित केले.

दि. १० डिसेंबर २०२० रोजी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी कोयना ज.वि. प्रकल्प टप्पा क्र. ४ येथे पाहणी दौरा केला. आधुनिक महाराष्ट्राच्या विजेच्या स्वयंपूर्ततेसाठी कोयना ज.वि. केंद्राचे योगदान अधोरेखित करताना आगामी काळात या प्रकल्पाच्या आधुनिकीकरणासाठी आवश्यक असणाऱ्या बाबींसाठी शासन सर्वतोपरी मदत करेल असा विश्वास मा. मुख्यमंत्र्यांनी या पाहणीदरम्यान व्यक्त केला.

तसेच या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर टप्पा क्र. १ व २ येथील संच क्र. २ चे Annual Overhaul चे काम जून २०२० मध्ये टप्पा क्र. ४ येथील संच क्र. २ चे Capital Overhauling चे काम नोव्हेंबर २०२० ते फेब्रुवारी २०२१, तसेच कोयना धरण पायथा विद्युतगृहामधील दोन्ही संचांचे Annual Overhauling जून २०२० व डिसेंबर २०२० अनुक्रमे करण्यात आले. ही महत्वाची Overhauling ची कामे कोयना प्रकल्पाच्या वीज निर्मितीच्या उपलब्धतेसाठी अत्यंत महत्वपूर्ण होती व ती व्यवस्थितरित्या पार पडली गेली.

***Activities carried out at KGSC during Covid-19 Pandemic :-***

1) Masks, Sanitizers and Handwash, Disinfectant Solutions and Sprays are distributed to the employees at Power Stations & Administrative Building.
2) Temperature checking machines, pulse oximeters and hand gloves purchased from local vendors for the initial screening and distributed to all sections.
3) Continuous disinfection of power house premises, colony and vehicle by Fire Fighting Team.
4) Cleaning is done in thoroughly by Sweeping, Cleaning with Detergent / Phenyl and finally cleaning with Sodium Hypochloride.
5) Regular patrolling is been done by security to ensure social distancing at power house and colony premises. The local essential service providers / shopkeepers have been instructed to maintain social distancing and take due care.
6) Guidelines of Tehsildar, Chiplun related to isolation and quarantine of employees travelling from out of the district has been circulated to all the employees.
7) All the events and functions at the recreation club have been cancelled.
8) Foot operated hand sanitizers dispensers designed by staff are used in power house & admin building; Automatic Hand Sanitizer Machines are installed at all entrances.
9) Vaccination drive was conducted for employees above 45 years age.
10) Isolation / Quarantine facility for employees established with all the necesseties.
11) Two nos. of well equipped ambulance are available 24x7 for employees. One ambulance is handed over to Taluka Health Department for emergency use.
12) Oxygen Cylinders are made available for emergency use in Power House, Dispensary and Ambulance.
13) Co-ordination Committee tackles the Pandemic situation by Regular Meetings and Follow-ups.
14) Follow-up of Covid-19 affected employees is taken on regular basis by Medical Superintend.

# घोड्याचे दु:ख

- डॉ. अतुल बनसोड
अतिरिक्त कार्यकारी अभियंता,
कोराडी औ.वि. केंद्र (३×६६० मेगावॅट)





सर्वत्र लगीनघाई सुरु होती. तेवढ्यात वरमाय आपल्या होणाऱ्या विहिणीला म्हणाली, आहो, घोडा आला का? मारुतीच्या मंदिरात जायची वेळ झाली. मुहूर्त चुकवायचा नाही आपल्याला! आणि हो थोडा नाचणाऱ्यांकरिता वेळ ठेवा. जरा लवकरच निघू. वरमायचा उत्साह अगदी ओसंडून वाहत होता. नवरदेव पण अगदी राजबिंडा असल्यामुळे घोडा मुद्दाम मागविण्यात आला होता. तेवढ्यात कोणीतरी आरोळी ठोकली. आला घोडा, आला... नवरदेव पण तयार होताच. घोडेवाल्याच्या मदतीने कसाबसा घोड्यावर बसला अन् वरात मंदिराच्या दिशेने निघाली, कर्कश बँड अन् नातेवाईकांच्या (तांडव) नृत्याला सुरुवात झाली ती परत मांडवात येईपर्यंत अखंड सुरु होती.

त्या सर्व गोंगाटात, आज का तर माझे लक्ष सतत घोड्यावर होते. या सर्व बँड अन् फटाक्यांच्या आवाजाचा त्याच्यावर काय परिणाम होत होता माहीत नाही, पण त्याच्या डोळ्यांतून सतत अश्रुधारा वाहत होत्या. त्याला पाहून माझ्या मनात सहज एक विचार तरळून गेला की, या जनावराला पण काही दु:ख असावे, कदाचित त्यामुळेच हा अश्रुपात असावा.

घोडा हा अनादि काळापासून माणसाचा सेवक, आपले काम चोख बजावणारा पाळीव प्राणी, जनावर असूनही आपल्या बळावर त्याने आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आणि सन्मानास पात्र झाला. पूर्वी युध्दात घोड्याला अनन्यसाधारण महत्व होते, इतिहास याला साक्ष आहे, छत्रपती शिवाजी महाराज, महाराजा राणा प्रताप, झाँशीवाली राणी इत्यादि आणि अनेक थोर पुरुषांचे घोडे त्यांच्या इतकेच महान तसेच पूजनीय होते. इतिहासात त्यांनी आपल्या पराक्रमाचा ठसा उमटविला. कालांतराने हळूहळू घोडे सैन्यातून बाद होत गेले, राहिले ते फक्त जुन्या परंपरा जपायला. नंतर हाच घोडा टांग्याला जुंपण्यात आला, रथाचे जू काढून त्याच्या खांद्यावर बग्गीचे जू दिले. पुढे रोषणाई केलेल्या स्वयंचलित वाहनांनी बग्गीवर पण मात केली अन् घोडा फक्त नवरदेवाचे वाहन बनून राहिला. कदाचित हेच त्या घोड्याचे दु:ख असावे. महान परंपरेतला जीव कुठल्या तरी बाष्कळ कामी लागला. कालांतराने त्याचे हे काम पण सुटेल, तरी हौसेला मोल नाही अजूनही केवळ हौसेपोटी, शर्यतीकरिता घोडे पाळणारे महाभाग आहेत, त्यातून घोडा ही जमात जिवंत राहील आणि आपल्या गौरवमयी इतिहासाची साक्ष देत राहील.

संस्कृतमध्ये एक सुभाषित आहे, त्याचा संदर्भ इथे तंतोतंत जुळतो. सोने हा अतिशय महाग, सर्वांना हवाहवासा वाटणारा धातू आहे, पण त्यालाही दु:ख आहेच, कारण जेव्हा सोनार सोन्याची तुला करतो तेव्हा तराजूच्या दुसऱ्या पारड्यात गुंजा (म्हणजे एका सामान्य वनस्पतीच्या बिया) ठेवतो.

******

## कोरोना कालावधीमध्ये वैतरणा (६० मेगावॅट) जल विद्युत केंद्राची उल्लेखनीय कामगिरी

सह्याद्रीच्या डोंगररांगाच्या गर्भाशयात वसलेले वैतरणा विभागातर्गंत ६० मेगावॅट वैतरणा जल विद्युत केंद्र हे सन १९७७ पासून यशस्वीपणे कार्यरत भुमिगत जल विद्युत केंद्र आहे.

दिनांक ११ जुलै २०१९ रोजी ढगफुटी आणि भूस्सखलनामुळे ६० मेगावॅट वैतरणा जल विद्युत केंद्राला नैसर्गिक आपत्तीचा सामना करावा लागला. आपत्तीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आणि मशिनला पुन्हा सेवेत आणण्याकरिता मोठ्या प्रमाणात काम करावे लागले, त्या अनुषंगाने विद्युतगृहाची कामे युध्दपातळीवर सुरु करण्यात आली होती. परंतु, २०२० वर्षांत कोविड-१९ विषाणूचा संसर्ग सर्व देशभर पसरल्यामुळे तसेच शासनाने दि. २३ मार्च २०२० पासून संपूर्ण देशभर लॉकडाऊन जाहीर केले. ज्यामुळे कामाची गती मर्यादित होती. वीज क्षेत्र हे आपत्कालीन सेवेमध्ये येत असल्याकारणाने लवकरात लवकर प्रकल्प पुन्हा सुरु करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडून परवानगी घेण्यात आली. शासनाने जाहीर केलेल्या कोविड-१९ च्या मार्गदर्शन तत्वाचे काटेकोरपणे पालन करण्यात आले आणि मनुष्यबळाच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड न करता काम टप्प्याटप्प्याने नियोजितपणे राबविण्यात आले.

संपूर्ण देशात लॉकडाऊनमुळे स्थानिक बाजारपेठ पूर्णपणे बंद झाली होती आणि बऱ्याच कंपन्या किमान मनुष्यबळावर काम करीत होत्या. अशा परिस्थितीत तेथील कामगारांनी उपलब्ध साधनांचा वापर करुन विद्युतगृह पुन्हा कार्यान्वित करण्याकरिता युध्दपातळीवर काम केले. दिनांक १५ ऑगस्ट २०२० रोजी स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने देशाची सेवा करण्यासाठी विद्युतगृह कार्यान्वित करण्यात आला. तसेच भविष्यात अशा प्रकारच्या घटना टाळण्याकरिता आवश्यक त्या खबरदारी घेऊन उपाययोजना करण्यात आल्या.

## नाशिक औष्णिक विद्युत केंद्रातील सेवानिवृत्त तानाजी भोर यांचे दैदिप्यमान यश

एकलहरे येथील नाशिक औष्णिक विद्युत केंद्रात ३८ वर्षे सेवा केल्यावर श्री. तानाजी भोर हे दि. ३० जून २०१६ रोजी सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्तीनंतर काय करावे, वेळ कसा जाईल याचीच चिंता अनेकांना असते. मात्र तानाजी भोर याला अपवाद ठरले.

सेवानिवृत्तीनंतर त्यांनी रनिंगला सुरुवात केली. तत्पूर्वी नोकरीत असताना त्यांना पोहण्याचा छंद होता. रोज सकाळी नाशिक रोड येथील महापालिकेच्या तरण तलावात दोन तास पोहण्याचा सराव करुन ते सकाळी ८ वाजता एकलहरे येथे कामावर येत. पोहण्याचे सातत्य त्यांनी त्यांच्या ४६व्या वर्षापासून सुरु ठेवले. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी वयाच्या ५८व्या वर्षी रनिंगला सुरुवात केली. यासाठी त्यांना केरळचे के.पी. कोशी कोच म्हणून लाभले.

सिंगापूर मास्टर्स ट्रॅक अॅण्ड फिल्ड असोसिएशन चॅम्पियनशिप या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत तानाजी सखाराम भोर (६२) यांनी सहभाग घेऊन भारताचे प्रतिनिधीत्व केले. बीबी नं. एम-६६०७ या स्पर्धेत ४०० मीटर रनिंगमध्ये सिल्व्हर, ८०० मीटरमध्ये सिल्व्हर, ४ बाय ४०० रिले रनिंगमध्ये ब्राँझ मेडल असे एकूण ३ मेडल्स भारतासाठी मिळविले. या स्पर्धेत जपान, ऑस्ट्रेलिया, ब्रुनी, इंडोनेशिया, हाँगकाँग, मलेशिया, सिंगापूर, अमेरिका, चीन, भूतान हे ११ देश सहभागी झाले होते. या स्पर्धा ६ ते ७ जुलै २०२१ रोजी कलिंगा स्टेडियम, सिंगापूर येथे झाल्या.

भोर हे सर्वसाधारण शेतकरी कुटुंबातील असल्याने खेळाची कुठलीही पार्श्वभूमी त्यांना नव्हती. मात्र जिद्द, चिकाटी आणि सततचा सराव या जोरावर त्यांनी सेवानिवृत्तीनंतरही आंतरराष्ट्रीय स्पर्धेपर्यंत मजल मारली.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे एक दिवसीय मार्गदर्शन शिबिराचे आयोजन

पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे दिनांक २८ ऑक्टोबर २०२१ रोजी महाराष्ट्र कामगार मंडळाचे प्रतिनिधी सौ. वैशाली नवघरे (कामगार कल्याण अधिकारी) अकोला शहर यांनी वीज केंद्रातील कंत्राटदारांना कामगार कल्याण निधी ऑनलाईन चालना भरणा करतांना येणाऱ्या अडचणी व इतर समस्यांचे निराकरण केले व महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाद्वारे कामगारांना लागू असणारे विविध कल्याणकारी योजनांबद्दल माहिती विशद केली.

सदर कार्यक्रमात पारस औ.वि. केंद्राचे कंत्राटदार संघटनेचे पदाधिकारी श्री. मनोज गेबल, श्री. मनोज काकड, श्री. दिनेश मोहोड, श्री. उमेश गायधने, श्री. गणेश सांबे, श्री. राजेश पटेल, श्री. हरीश मस्के, श्री. उमेश भांबडकर, सौ. विजया लहाने, श्री. दिपक खंडारे प्रामुख्याने उपस्थित होते.

## महानिर्मितीच्या पुढाकाराने उपजिल्हा रुग्णालय कामठीत प्राणवायु प्रकल्प सुरु

महानिर्मितीकडून मिशन प्राणवायूच्या दुसऱ्या टप्प्यातील ३५ घनमीटर प्रति तास क्षमतेच्या कामठी उपजिल्हा रुग्णालयातील प्राणवायु प्रकल्पाचे लोकार्पण सोमवारी ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. दररोज ९५ टक्के एवढ्या शुध्दतेचा सुमारे ६५ ते ६० रुग्णांना प्राणवायूचा पुरवठा शक्य होणार आहे.

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत राज्यभर रुग्णांना प्राणवायूची प्रचंड टंचाई निर्माण झाली होती. त्यानंतर मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी महानिर्मितीच्या कोराडी, खापरखेडा प्रकल्पातील ओझोन प्रकल्पातून प्राणवायूची निर्मिती शक्य आहे काय, याची चाचपणी करण्याची सूचना केली होती. त्यानंतर ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी महानिर्मितीला मिशन प्राणवायू धोरण निश्चित करण्याची सूचना केली. त्यानुसार महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय खंदारे यांच्या नेतृत्वाखाली सांघिक सामाजिक बांधिलकीतून महानिर्मितीने तीन टप्प्यांमध्ये महत्वाकांक्षी मिशन ऑक्सिजनचा आराखडा तयार केला. पहिल्या टप्प्यात स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय, अंबेजोगाई येथे प्रतिदिन २८८ जम्बो सिलेंडर क्षमतेचा व ९५.२ टक्के शुध्दतेचा ऑक्सिजन प्लांट दि. २७ एप्रिलला कार्यान्वित झाला.

दुसऱ्या टप्प्यात खापरखेडा वीज केंद्रामार्फत उपजिल्हा रुग्णालय कामठी येथे सोमवारी प्राणवायू प्रकल्प सुरु झाला. तर परळी वीज केंद्रामार्फत जिल्हा रुग्णालय परभणी येथे, पारस वीज केंद्रातर्फे मेडिकल कॉलेज अकोला येथे प्राणवायू प्रकल्प उभारणीचे काम अंतिम टप्प्यात आहे. तिसऱ्या टप्प्यात कोराडी (नागपूर), पारस (अकोला), व परळी (बीड) येथे वीज केंद्र परिसरातच प्राणवायू रिफिलिंग / बॉटलिंग प्रकल्प उभारण्यात येणार आहे. कामठीतील कार्यक्रमाला जिल्हाधिकारी रवींद्र ठाकरे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी योगेश कुंभेजकर, कामठीचे नगराध्यक्ष शहाजहाँ अंसारी, उपाध्यक्ष अहफाज अहमद, डॉ. देवेंद्र पातूरकरसह अन्य अधिकारी उपस्थित होते. प्रेशर स्विंग ॲडसॉर्पशन (पी.एस.ए.) तंत्रज्ञानावर आधारित असलेला नागपूर ग्रामीणमधील या पहिल्या प्रकल्पासाठी महानिर्मितीचे संचालक (संचलन) मा.श्री. चंद्रकांत थोटवे, मुख्य अभियंता मा.श्री. राजू घुगेसह अन्य अधिकाऱ्यांनीही परिश्रम घेतले.

# अशय सोशल ग्रुप – पर्यावरणसंवर्धन संस्था


**– सीमा खंडाळे**

अशय सोशल ग्रुप, ऋतू एंटरप्राइजस

**द्वारा : जितेंद्र खंडाळे**

प्रकाशगड, मुख्यालय, मुंबई


**(महिला कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने संवेदनशील विषयावरील प्रबोधनपर लेख)**



नमस्ते,

"अशय सोशल ग्रुप" ची स्थापना ऑक्टोबर २०१५ मध्ये पर्यावरण संरक्षणार्थ झाली.

'प्लास्टिकच्या पिशव्या न वापरता, कापडी पिशवी वापरा!', हा पहिला कार्यक्रम सुरू झाला. जुन्या साड्या मागून त्यातून कापडी पिशवी शिवून, ती लोकांना मोफत वाटणे, असा हा कार्यक्रम!

उद्देश फक्त एकच कि प्लास्टिक पिशवीचा कचरा कमी व्हावा. या कामासाठी पिशव्या शिवून देण्यासाठी भुसावळला महिलांची एक टीम तयार तयार झाली. जास्त नाही पण थोडेसे अर्थार्जन त्या त्यातून करू शकल्या. आज पर्यंत ३२००० पेक्षा जास्त पिशव्या वाटण्यात आल्या आहेत. 'वाटणे' या साठी, कारण कोणी जर आपल्याला भेट स्वरूपात काही देऊ केले तर ते अनमोल असते, आणि ते आपण जपून नीट वापरतो. आणि माझा फायदाही तर होणारच त्यातून, कसा ते सांगते... एका व्यक्तीने रोज ही कापडी पिशवी वापरायला सुरुवात केली तर, दिवसाला एक जरी पिशवी नाकारली, तरी आठवड्याला साधारण ४–५ ला नाही म्हणतील, महिन्याला हा आकडा २०–२५ होईल. जर एक व्यक्ती इतकं प्रदुषण रोखू शकत असेल तर आपण सगळे मिळून नक्कीच खूप काही करू शकतो.

हे करत असताना, एक लेख वाचनात आला, एका कपाची ती गोष्ट होती! शोध सुरू झाला, त्या विषयी जे वाचायला मिळेल ते शोधू लागले. माझी एक इच्छा इतकीच होती की हा कप मी हातात घेऊन, किंमत बघून, मला परवडत असेल तर घेईन. दोन महिन्यांनी एक पर्याय सापडला, आणि कप मला माझ्या बजेट मध्ये मिळाला. घरी आले आणि कप पाळी नसतांनाही वापरून बघायला घेतला. आणि आयुष्यात पहिल्यांदा पाळी कधी येते याची वाट बघू लागले!!

झाले, जून २०१६ ची माझी पाळी ही माझ्या जीवनातील एक वेगळ्या वाटेवरचा एक टप्पा ठरला.

मेंस्ट्रुअल कप, सिलिकॉनने बनलेला, मेडिकल ग्रेडेड मटेरियल असल्याने शरीरात ठेवण्या योग्य, असा हा कप पाळीच्या वेळी वापरतात. सिलिकॉनचा असल्याने, आरोग्यासाठी योग्य पर्याय!! एक कप बरीच वर्षे वापरता येतो, म्हणजे, कुठलाच कचरा नाही, अर्थात, पर्यावरण पूरक पर्याय!! आर्थिक दृष्ट्या ही हा पर्याय योग्य, कारण जे पैसे तुम्ही सॅनिटरी पॅड मागे, महिन्याला १००–१५०/– खर्च करतात, ते एका कप च्या किमतीत, ५–६ महिन्यात वसूल होतात.

हा कप वापरण्याची काही विशिष्ट पद्धत असते, ती एकदा समजली की झाले, कप तुमचा जवळचा मित्रच बनतो.

"मासिकेचा कप" किंवा मी ज्याला "ऋतू कप" असे म्हणते, तो सिलिकॉन, मेडिकल ग्रेडेड मटेरियल चा बनविलेला असतो. शरीरात तो गुप्त मार्गात बसविला जातो. ठराविक वेळेनंतर तो काढून, धुवावा लागतो.

एक कप साधारणपणे ५ ते १० वर्षे आरामात वापरू शकतो.

हे वापरल्यामुळे आरोग्य संभाळता येते, खर्च कमी होतो, आणि कुठलाच कचरा होत नाही.

सर्वच बाबतींत कप फायदेशीर आहे... मी ठिकठिकाणी जाऊन मेंस्ट्रुअल कपच्या वापराबद्दल जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करते. यामुळे महिलांना अगदी बिनदिक्कत पोहणे, व्यायाम, योगासने करता येतात. पावसातही मनसोक्त भिजता येते. एका वेळी हा कप, जास्त स्त्राव असेल तर चार ते पाच तास आणि कमी असेल तर सात ते आठ तास वापरता येतो. कपड्यांना डाग पडणे, वारंवार सॅनिटरी पॅड बदलावे लागणे, वावरताना अवघडलेपण येणे अशा सगळ्या त्रासातून यामुळे सुटका होते. शिवाय खर्चही एकदाच करावा लागतो. याची स्वच्छता करणेही अगदी सोपे आहे. आरोग्याच्या दृष्टीनेही याचे घातक परिणाम नाहीत. सॅनिटरी पॅड्सच्या वापरामुळे निर्माण होणारा प्रचंड कचरा, अस्वच्छता, पर्यावरणाचे होणारे अपरिमित नुकसान आपण कपच्या वापरामुळे सहज टाळू शकतो. आपल्या एका कृतीने आपण निसर्गाच्या, पृथ्वीच्या रक्षणासाठी हातभार लावू शकतो, या सगळ्या बाबी मी महिलांना समजावते. त्यांना हा कप वापरण्यासाठी प्रोत्साहन देते. प्रेरणा देते.

हे काम करीत असताना मला जाणवले की आपल्या समाजात असा एक वर्ग आहे जो ऑनलाइन मार्केट पर्यंत पोचवू शकत नाही, या लोकांना हा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी, मी एक कप डिझाईन केला, ज्याला मी "ऋतुकप" असे सोप्पे नाव दिले! २०१७ फेब्रुवारी मध्ये हा कप तयार केला, महाराष्ट्रात!! हो, हे प्रोडक्ट 'मेड इन इंडिया' आहे!!! आणि अभिमानाने मी सांगू शकते की, आजपर्यंत साडेतीन हजारावर, फक्त ऋतुकप वापरणाऱ्या आनंदी मुली आणि स्त्रिया आहेत. तसेच, अजून बऱ्याच हजारो अशा ही भगिनी आहेत, ज्या माझे या विषयीचे विचार ऐकून या वाटेवर आल्या आहेत व येत आहेत. सगळयात मोठा विश्वास त्यांना हा वाटतो की, मी सतत त्यांच्या सोबत असते, अगदी फोनच्या एका हाकेच्या अंतरावर... गुगल बाबाकडून बरेच प्रश्न अनुत्तरित राहतात, तिथे माझी मदत त्यांना होते.

या विषयी शाळांमध्ये, कॉलेजेस मध्ये, सरकारी कार्यालये, कॉर्पोरेट ऑफिसेस मध्ये, महिला मंडळे, अंगणवाडी सेविकांसोबत, ग्रामीण भागात, रोड साइड ला राहणारे, दृष्टिदोष असणारे, शारीरिक दृष्ट्या दोष असणाऱ्या, रेड

लाइट एरियातील महिला, थोडक्यात, जिथे जिथे स्त्रियांना पाळी येते, त्या त्या एरियात जाऊन मेंस्ट्रुअल कप विषयी व कापडी पॅड विषयी मी बोलले आहे व हे सुरूच राहील. समोर कुठलीही स्त्री किंवा मुलगी असो, तिच्या भाषेत, तिला समजेल त्या प्रकारे, समजावून सांगण्याचा माझा प्रयत्न असतो.

कापडी पॅड हा एक दुसरा शाश्वत पर्याय!!

कापडी पॅडस्...

आपण रोज आपले कपडे जसे रोज वापरून झाले की स्वच्छ धुवून, कोरडे वाळवून मगच पुन्हा वापरतो, तीच संकल्पना या कापडी पॅड मागे वापरली जाते.

हे कापडी पॅड कॉटन च्या कपड्याने बनवितात. कॉटन च्या कपड्यात द्रव्य पदार्थ शोषून घेण्याची एक वेगळी क्षमता असते, म्हणून हे योग्य ठरते. तसेच काही वर्षांनी हे कापड वापरून टाकून द्यावे असे जरी वाटले तरी हे जमिनीत काही वेळानंतर विघटित तर होणार, ही शाश्वती नक्कीच!

या पॅड चे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे, हे पॅड लिक(गळत) होत नाहीत, त्यामुळे डाग पडण्याची भीती राहत नाही. त्यामुळे आपण अगदी बिनधास्त पणे हे पॅड वापरू शकतो. PUL, म्हणून एक विशिष्ट कापडाचा प्रकार असतो, तो या साठी वापरला जातो. हा कापडी पॅड बरेच वर्षे वापरता येतो, तसेच हा जमिनीत विघटित होणारा असा आहे, त्या मुळे हाही पर्यावरण पूरक ठरतो.

हे पॅड, विविध प्रकारात मिळू शकतात, किंवा आपण बनवू शकतो. काही पातळ, जरा मध्यम किंवा थोडे जाड, हे सगळे ठरविले जाते त्यातील कापडी थरांमुळे. आकारात ही विविधता बघायला मिळते, जसे सॅनिटरी पॅडस मध्ये, लार्ज, लॉंग पॅड, नाईट पॅड नॉर्मल पॅड असे विविध प्रकार दिसतात, तसेच या कापडी पॅड मधे ही बघायला मिळतात. आपल्या गरजे नुसार, आपण हे निवडू शकतो.

खूप सुंदर अशा डिझाइन, रंग यात आपल्याला बघायला मिळतात.

या कापडी पॅड चे खास वैशिष्ट्य म्हणजे, यात कुठलेही रासायनिक पदार्थ, जे आपल्या शरीराला हानिकारक, त्रासदायक असे काहीही नसते, त्यामुळे हा पर्याय, आरोग्यासाठी अगदी योग्य ठरतो.

४-५ कापडी पॅड चा जर आपल्या कडे सेट असेल तर आपण ते ४-५ वर्षे आरामात वापरू शकतो.

यांना धुवायची एक सोप्पी पद्धत आहे, वापरलेला पॅड, थंड पाण्यात १५-२० मिनिटे भिजवून ठेवावा. नंतर ते पाणी निथरवून टाकावे. साबण लावून ब्रश ने हलक्या हाताने हे धुवावे. नंतर हवे तर गरम पाणी आणि डेटॉल आपण वापरू शकतो. त्यानंतर हा पॅड घट्ट पिळून, उन्हात सुकवावा. हे खूप महत्त्वाचे! उन्हात सुकविण्याने त्यातील जंतू (बॅक्टेरिया) नाहीसे होतात. कापडी पॅड नवीन वयात येणाऱ्या मुलींसाठी तर एक वरदानच म्हणता येतील. प्लास्टिकच्या सॅनिटरी पॅड पासून होणारा कचरा, त्यातील रासायनिक पदार्थांमुळे होणारे त्रास, पर्यावरणात होणारा कचरा टाळला जाऊ शकतो.

हे कापडी पॅड कसे बनवावे, कसे वापरावे, आपल्या कडील वस्तूंनी हे आपण कसे बनवू शकतो हे सगळे मी शिकवते. मला त्यांच्या पर्यंत पोचायला नाही जमले तर ते घरी येऊन शिकून जातात व पुढे बाकीच्यांना शिकवतात. हे सगळे आम्ही विना मोबदला करतो, यात स्वार्थ एकच, कचरा कमी करणे, ते ही शाश्वत पर्यायांनी!!

एका महिन्यात एक स्त्री १२-१५ रक्ताने भरलेले, वापरलेले प्लास्टिकने बनविलेले पॅड्स कचऱ्यात फेकते, वर्षाला साधारण (१२×१२=१४४)१५० पॅड्स जमिनीवर फेकतात. एक स्त्री साधारणपणे ४० वर्षे या मासिक चक्रातून जात असते. तर हा आकडा सहजपणे ६००० पर्यंत जाऊ शकतो!! जगातील सर्व या चक्रातून जाणाऱ्या स्त्रियांचा विचार केला तर??

आणि प्लास्टिक कधी जमिनीत विघटित होणार आहेत हे कोणीच सांगू शकत नाही.

आज या कामाची दखल सामाजानेही घेतली आहे. लोकमतने महिला दिनानिमित्त २०१८ मध्ये, 'बाईमाणुस' म्हणून निवड केलेली. तसेच, २०१८ मध्ये सामाजिक उद्योजिका पुरस्काराची मानकरी. तसेच, गुरुनाथ फौंडेशनच्या वतीने, श्री एकनाथराव खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली, रक्षाताई खडसे यांच्या नेतृत्वाखाली 'बहिणाबाई' पुरस्काराने ही सन्मानित करण्यात आले. तसेच तरूणाई युवा २०१८ महिला सन्मान पुरस्कार रे फौंडेशनतर्फे, सामाजिक क्षेत्रातील कामा बद्दल पुरस्कार. २०२० मध्ये महिला दिनाच्या वेळी, भारतातून, हजारातून, ३० मध्ये, धांसू उमनिया, इंडियास टॉप ३० अवॉर्डीस अशी निवड करण्यात आली. गुरुवर्य सम्मान २०२१, हॅट्स, बंगलोर कडून मिळाला. उरणी फौंडेशन, चेन्नईकडून वर्किंग वुमन अचिव्हर्स अवॉर्डस कडून ५० मधून एक वुमन अचिव्हर्स फेब्रुवारी २०२१ मध्ये निवडण्यात आले. महाराष्ट्र राज्य व्यवसायिक महिला संघटना शासकीय पुरस्कार २०२१ यात निवड झाली.

सोशल मीडियावरही हा उपक्रम बऱ्याच ठिकाणी प्रकाशात आणला जातो.

टी.व्ही.वरही विज्ञान वार्तामध्ये न्युज लोकमतवर, तसेच झी २४ तासवर नवदुर्गा म्हणून नवरात्रीच्या वेळी सम्मान मिळाला.

रेडिओच्या माध्यमातून धुळे, भोपाळ, अहमदाबाद, मुंबई, सुरत, दिल्ली इत्यादी ठिकाणी कार्यक्रम प्रसिद्ध केला गेला आहे. ऑल इंडिया रेडिओच्या अस्मिता कार्यक्रमातही माझी मुलाखत झाली आहे.

दोन वेळा Tedx स्पीकर म्हणून Tedx Kharghar, Tedx Tarabai Park येथे निवड झाली.

महाराष्ट्र राज्य व्यवसायिक महिला संघटना, शासकीय पुरस्कार २०२१ हाही जाहीर झाला आहे.

सोशल मीडियानेही आपल्या या कामाची खूप दखल घेतली आहे, त्यामुळे बऱ्याच लोकांपर्यंत पोहोचता आले. दुसऱ्या देशातही या माध्यमातून हे जनजागृती कार्य करता आले, We Chat वरून चीन मध्ये या विषयी आपण कार्यशाळा घेऊ शकलो व ऋतू कप तिथे पाठवू शकलो!! ऑस्ट्रेलिया, नेपाळ, मलेशिया, जॉर्जिया, नैरोबी ई. ठिकाणी या विषयावर जागरूकता पसरवणे शक्य झाले आहे. प्रत्यक्ष जाऊनही मला बोरकुंड, धुळे, अजमेर, खरवा, नागाव, पाळसे, उंबरखेड येथील ग्रामीण भागातील कष्टकरी महिलांमध्ये जनजागृतीचे काम करता आले. गुऱ्हाळपनी सारख्या आदिवासी भागातील महिलांसाठी काम केले. जवळ जवळ या पाच वर्षात मी २५-३० हजार लोकांपर्यंत ऑनलाइन- ऑफलाईन मी नक्कीच पोचले आहे. आणि पुढे ही या विषयावर काम करीत राहीन.

माझी सगळ्यात मोठी ओळख, "कप वुमन", "कप क्वीन" म्हणून आहे. मी डिझाईन केलेला, ऋतू कप वापरणाऱ्या सगळ्या सख्या माझ्या शिलेदार

आहेत, त्यांचा अनुभव मला हे कार्य पुढे नेण्यात खूप मदत करते.

आपल्याकडे एकच धरती माता आहे, जी आपल्या सगळ्या मूलभूत गरजा पूर्ण करते, तिला आपणच खराब करीत आहोत, आणि आपण हा ही विचार करायला हवा की पुढच्या पिढीला आपण काय देणार आहोत ?

या कार्यात सगळ्यांना एकच विंनंती... शाश्वत पर्याय स्वीकारा आणि एकदा वापरून टाकून देणाऱ्या वस्तू टाळा व पर्यावरण व आपले आरोग्य सांभाळा. हे सगळे आपण आपल्या पुढील पिढीच्या रक्षणार्थ करूयात!! धन्यवाद...

******

## महानिर्मितीला हरित ऊर्जा निर्मितीकरिता प्रतिष्ठेचा इंडिया ग्रीन एनर्जी पुरस्कार

महानिर्मितीला इंडियन फेडरेशन ऑफ ग्रीन एनर्जी संस्थेने सन २०२१ करिता इंडिया ग्रीन एनर्जी पुरस्काराने सन्मानित केले असून हा पुरस्कार दिनांक २० ऑक्टोबर २०२१ रोजी मा.ना.नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री यांचे हस्ते दिल्ली येथे प्रदान करण्यात आला. पर्यावरणपूरक हरित ऊर्जा निर्मितीकरिता हा पुरस्कार देण्यात येतो. मुख्यमंत्री कृषी वाहिनी योजनेअंतर्गत उभारण्यात आलेले व नियोजित सौर ऊर्जा प्रकल्पांकरिता हा पुरस्कार महानिर्मितीला देण्यात आला आहे.

महानिर्मितीने मुख्यमंत्री कृषी वाहिनी योजनेअंतर्गत आदर्श ग्राम राळेगणसिद्धी येथे २ मेगावॅट तसेच यवतमाळ जिल्ह्यामध्ये मांजरडा येथे २ मेगावॅट आणि अमरावती जिल्हा येथील गव्हाणकुंड येथे १६ मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्पांची उभारणी करून त्या-त्या भागातील शेतकऱ्यांना दिवसा खात्रीशीर वीज पुरवठा होण्यासाठी वरील प्रकल्पांची उभारणी केली आहे.

राज्याच्या विजेच्या एकूण मागणीमध्ये शेतीकरिता विजेचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात येतो. यामध्ये मागणी आणि पुरवठा पाहता महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना रात्रीचा वीज पुरवठा करण्यात येत असल्याने त्यांना अनेक संकटाना सामोरे जावे लागते. तसेच वीजनिर्मिती केंद्रापासून शेतीकरिता वीज वापराचे ठिकाणापर्यंत वीज वहनामध्ये सरासरी १०% तुट होत असते. मात्र या योजनेअंतर्गत छोटे सौर ऊर्जा प्रकल्प हे विजेच्या मागणीच्या ठिकाणाजवळ उभारण्यात येत असल्याने वीज वहनातील तूट कमी होण्यास मदत मिळणार आहे. तसेच औष्णिक वीज निर्मिती ऐवजी सौर ऊर्जा प्रकल्पातून ही वीज निर्मिती केल्यास कोळश्यापासून होणारे प्रदूषण वर्षानुवर्षे कमी होण्यास मदत मिळणार आहे.

पर्यावरणपुरक हरित वीज निर्मितीचे महानिर्मितीद्वारे शेतकऱ्यांना वाजवी दरामध्ये खात्रीशीर दिवसा वीज पुरवठा करता यावा याकरिता महानिर्मितीतर्फे कोणताही फायदा न घेता वीज खरेदी करार करण्यात येत असून महानिर्मिती एकूण ५८३ मेगावॅट सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारणी करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून यापैकी टप्पा १ अंतर्गत राज्यातील विविध ४६ ठिकाणी १८४ मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पांची उभारणी सुरु असून ते मे २०२२ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. तसेच उर्वरित प्रकल्प टप्प्याटप्प्याने नजीकच्या काळात कार्यान्वित करण्यात येणार आहेत.

## महानिर्मितीच्या कोराडी औ.वि. केंद्रातील अधिकाऱ्यांचे ऑडक्स इंडिया रॉंदेनिअर्स क्लब आयोजित सायकलिंग स्पर्धेत दैदिप्यमान यश

फ्रान्स येथील 'ऑडक्स सायकलिंग क्लब' च्या वतीने संपूर्ण जगात विविध देशांमध्ये रॉंदेनिअर्स ब्रेव्हेट (BRM) साहसी सायकलिंग स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. भारतात देखील 'ऑडक्स इंडिया रॉंदेनिअर्स' क्लबद्वारे अश्या प्रकारच्या सायकलिंग स्पर्धा मोठमोठ्या शहरांमध्ये घेण्यात येतात. BRM स्पर्धेला यावर्षी १२ सप्टेंबरला शंभर वर्षे पूर्ण झाल्याने शतक वर्षपूर्तीनिमित्त विविध शहरांमध्ये सायकल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

नागपूर रॉंदेनिअर्स क्लबच्या वतीने १२ सप्टेंबर रोजी उपराजधानीत झिरो माईल्सपासून मध्यप्रदेशातील पीपलपाणी व तेथून परत नागपूर झिरो माईल्सपर्यंत २०० किलोमीटर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विविध शहरातील राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय तसेच नवोदित सायकलपटूंनी सहभाग घेतला. ऐतिहासिक २०० किलोमीटर स्पर्धेत महानिर्मितीचे कोराडी येथे कार्यरत सहाय्यक कल्याण अधिकारी श्री. दिलीप वंजारी, कोराडी स्थापत्य प्रकल्प विभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. रवींद्र पांढरे तसेच चंद्रपूर येथे कार्यरत सहाय्यक अभियंता श्री. संभाजी बडगुजर यांनी या स्पर्धेत सहभागी होऊन निर्धारित १३.३० तासाच्या वेळेआधी ८ तासांत २०० किलोमीटर पूर्ण केली.

BRM ही लांब अंतराची सायकल स्पर्धा असून नियोजित वेळेत पूर्ण करावी लागते. BRM स्पर्धाही संपूर्ण स्वत:च्या हिमतीवर तसेच कोणाचीही मदत न घेता पूर्ण करावी लागते. एका वर्षात २०० किमी, ३०० किमी, ४०० किमी आणि ६०० किलोमीटर पूर्ण करणाऱ्या सायकलवीराला सुपर रॉंदेनिअर म्हणून गौरवण्यात येते.

श्री. दिलीप वंजारी, सहाय्यक कल्याण अधिकारी यांनी नुकतेच दिनांक २५/०९/२०२१ रोजी ६०० किलोमीटर BRM नागपूर ते जबलपूर परत नागपूर ही स्पर्धा नियोजित ४० तासाच्या आधी २६ तासात यशस्वीरीत्या पूर्ण केली. श्री. दिलीप वंजारी यांनी गेल्या दोन महिन्यात २०० कि.मी. दिनांक ११/०९/२०२१ रोजी ३०० कि.मी. २५/०८/२०२१ रोजी ४०० कि.मी. दिनांक २९/०८/२०२१ रोजी आणि ६०० किलोमीटर सायकल स्पर्धेत सहभाग घेऊन यशस्वी कामगिरी केली. महानिर्मिती कंपनीमधून ते पहिले सुपर रॉंदेनिअर सायकलिस्ट ठरले. महानिर्मिती कंपनीने ऊर्जा निर्मितीमध्ये उच्चांक सोबतच विविध क्रीडा स्पर्धेत खेळाडूंना प्रोत्साहन देऊन उत्कृष्ट खेळाडू निर्माण केले.

## आम्ही आपले आभारी आहोत

**भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रातून माहे ऑगस्ट २०२१ मध्ये सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

(१) श्री. राजेंद्र जनार्दन गोसावी - कार्यकारी अभियंता, (२) श्री. राजेंद्रकुमार सुधाकर मारकड - उप कार्यकारी अभियंता, (३) श्री. गणेश तुकाराम तायडे - तंत्रज्ञ-२.

**खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातून माहे जून २०२१ मध्ये सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

(१) श्री. शाम शरदचंद्र बोक्षे - कार्यकारी अभियंता, विद्युत संधारण विभाग - ५०० मेगावॅट, (२) श्री. अशोक भगवानराव चिपडे - वरिष्ठ व्यवस्थापक, सुरक्षा विभाग, (३) श्री. रामकृष्ण गोटीराम उंबरकर - अतिरिक्त कार्यकारी अभियंता, विद्युत संधारण विभाग - २१० मेगावॅट, (४) श्री. हेमंतकुमार दामोदर बेंडे - अतिरिक्त कार्यकारी अभियंता, संच क्र. ३/४, २१० मेगावॅट, (५) श्री. विलास सदाशिवराव भोयर - अतिरिक्त कार्यकारी अभियंता, चक्र संधारण विभाग - ५०० मेगावॅट, (६) श्री. संजय पांडुरंग चवरे - तंत्रज्ञ-१, बाष्पक संधारण विभाग - ५०० मेगावॅट, (७) श्री. नरेंद्र मधुकरराव भस्मे - तंत्रज्ञ-१, कोळसा हाताळणी विभाग, संचलन, २१० मेगावॅट, (८) श्री. भिमराव सोमाजी चक्रे - तंत्रज्ञ-१, कोळसा हाताळणी विभाग, ई.एम., २१० मेगावॅट, (९) श्री. अनिल सखाराम राऊत - तंत्रज्ञ-२, जल प्रक्रिया विभाग, २१० मेगावॅट, (१०) श्री. जागेश्वर मोतीराम माहुले - अर्धकुशल कारागीर, जल प्रक्रिया विभाग, २१० मेगावॅट, (११) श्रीमती. मालन भा. नागरगोजे - सफाई कामगार - रुग्णालय.

**पारस औष्णिक विद्युत केंद्रातून माहे सप्टेंबर २०२१ मध्ये सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

(१) श्री. अशोक तुळशीराम लाहुडकर - सहाय्यक अभियंता, कोळसा हाताळणी विभाग, (२) श्रीमती. कांताबाई शंकर कराळे, शिपाई (वित्त व लेखा).

## आपण यांना अंतरलो

१) **कै. संजय भास्कर राशतवार - तंत्रज्ञ-२,**
चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र
**मृत्यु दिनांक :** ०७ ऑक्टोबर २०२१.

## पारस औ.वि. केंद्राचा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे दिनांक २५ ऑक्टोंबर २०२१ रोजी औष्णिक विद्युत केंद्राचा वर्धापन दिन संपन्न झाला. प्रभारी उप मुख्य अभियंता श्री. ज्ञानेश्वर दामोदर यांच्या हस्ते सर्वप्रथम मुख्य प्रवेशद्वाराचे पुजन करण्यात आले, तर अधीक्षक अभियंता श्री. आर.बी. गिरी प्रभारी अधीक्षक अभियंता श्री. राजेश गट्टुवार, तसेच कार्यकारी अभियंता यांची प्रमुख उपस्थिती इतर कमचारी वृंद यामध्ये श्री. संतोष केंडे, श्री. योगेश पतिया, श्री. राजेश रौदळे, सुनिल खंडारे, सौ. वर्षा चीलवंत, सौ. सुनंदा बेहरे, निलय महाजन, चेतन अघम उपस्थित होते.

वर्धापन दिनाचे औचित्य साधून पारस औष्णिक विद्युत केंद्रातील कर्मचारी व विद्युतनगर वसाहतीमधील निवासी कर्मचाऱ्यांचा परिवारातील सदस्य यांच्याकरिता विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने विभाग स्वच्छता, सुरक्षितता व CDCS स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, चित्रकला स्पर्धा निबंध स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा, वृक्षारोपण स्पर्धा, आनंद मेळावा कार्यक्रमाचे आयोजन समितीमार्फत करण्यात आले. औष्णिक विद्युत केंद्राच्या वर्धापन दिनाचे औचित्याने कर्मचाऱ्यांना CYBER SECURITY बददल माहिती व्हावी म्हणून राष्ट्रीय पातळीवर राबिवल्या जाणाऱ्या CYBER SECURITY मासांतर्गत विविध स्पर्धा CYBER SECURITY विषयाला अनुसुरुन आयोजित करण्यात आल्या. सर्व स्पर्धाचे बक्षिस वितरण या कार्यक्रम अंतर्गत करण्यात आले. सदर स्पर्धा यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी पारस औष्णिक विद्युत केंद्रातील अभियंता, तंत्रज्ञ, तसेच संघटना प्रतिनिधी व कार्यालयातील कर्मचारी वर्ग यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

वर्धापन दिन यशस्वीरित्या व उत्साहात साजरा करण्यासाठी वर्धापन दिन समिती गठित करण्यात आली. त्यातील मोलाच्या सहकार्याने व मार्गदर्शनाने सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यात आला. सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी समिती अध्यक्ष तथा औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे, उपाध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर दामोधर, सल्लागार - अधीक्षक अभियंता श्री. आर.बी. गिरी, श्री. धनंजय पंधाडे अधीक्षक, प्रभारी अधीक्षक अभियंता श्री. राजेश गट्टुवार, कार्यकारी अभियंता श्री. संतोष केंडे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. वि.एस. अर्बट, श्री. एस.के. औरंगाबादकर, वरिष्ठ व्यवस्थापक (मासं) श्री. अतुल बोरकर, वरिष्ठ व्यवस्थापक आ. (सुरक्षा) श्री. बालाजी अंबड, समन्वयक - कार्यकारी अभियंता श्री. योगेश पतिया, प्रभारी अधीक्षक अभियंता श्री.राजेश गट्टुवार; सचिव - श्री. श्याम गुड्डे; कोषाध्यक्ष श्री. एस.एस. पठाण; सहकोषाध्यक्ष श्री. एस.एस. इंगळे; सह सचिव श्री.आनंद तायडे, श्री. नागेश मुंडे; सदस्य श्री. राजेश लंगोटे, श्री.अमोल भाकरे, विकास बोधनकर, श्री. विजय डी. दिवसे, सतीश सातींगे, सुनिल सुरेश या समितीसह पारस औष्णिक विद्युत केंद्रातील सर्व अधिकारी, अभियंता, कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी व सुरक्षा विभाग या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# आपले कुटुंब सहकारी आपलीच जबाबदारी

- राजेश लक्ष्मण वऱ्हाडे
एम.आय.एस. विभाग,
पारस औ.वि.केंद्र



आपले कुटुंब सहकारी आपलीच जबाबदारी आहे. कोरोना-कोविड असो वा स्वाईन फ्लू. येणाऱ्या काळात मानवाने किती सुरक्षित व्हावे, याची जाणीव करुन दिली आहे. साऱ्या देशांना त्यांना मेटाकुटीला आणले कारण मनुष्य निष्काळजी होत होता. काय होते हात धुवून, धुवायलाच पाहिजे का ? सवय आणि परिस्थिती पाहून मग तुम्ही रोगप्रतिकार शक्ती वाढवायला पाहिजे.

जरा काही दुखायला लागलं की, आपण डॉक्टरकडे जातो. पण सुरुवातीला उपचार आपण घरात करु शकतो. अपचन असो, सर्दी-पडसे आपण महागडे डॉक्टर आणि त्यांची महागडी औषधे, त्यात लवकर आराम पडावा म्हणून जास्त पॉवरच्या गोळ्या घेतो. परंतु, त्यांचे त्यावेळी आपण हे विचारत नाही की, त्याचे काही दुष्परिणाम किती किंवा अन्य आजार होऊ शकतात का ? तब्येत बरी व्हावी एवढीच इच्छा असते. परिणाम पुढे होतील ते होतील.

धावपळीच्या युगात जर मी घरच्या घरी काही उपाय करता येतील तर मनुष्य त्याकरिता तयार होणार की नाही. लवकर बरे होणे घरगुती कामासाठी वेळ कुठे आहे. हातपाय, डोके दुखणे आणि हातातील पॉईंट तर दाब दिला तर आराम मिळतो. त्यावरही हवा आहे किंवा सर्दी-पडशावर हा उपाय असरदार आहे. हळद किंवा दूध सकाळी किंवा कोमट पाण्यात छोटा चमचा हळद टाकून घेतल्यास तुमचे सर्दी-पडसे नाक मोकळे होईल. रोगप्रतिकारशक्ती वाढण्यास गुळवेलचा काढाही सोबत आहे. तरी त्याच्या गोळ्या मिळतात हे स्वत:हून सांगतो. दवाखान्यात जाऊ नका असा आग्रह किंवा जबरदस्ती नाही. कारण सर्व डॉक्टर लोक माझ्यावर भांडतील परंतु, आपण थोडा यावर विचार करावा, नो साईड इफेक्टस जगण्याची गरज आहे.

तोंडामध्ये पाण्याची गुळणी धरुन अंघाळ केल्यास तुम्हाला सर्दी-पडसे होणार नाही. अनुलोम विलोम, प्राणायाम तुमचा कफ बाहेर काढण्यासाठी, पोटासाठी मंडुकासन, पवनमुक्तासन, सूर्यनमस्कार अशी आसने-व्यायाम आहेतच. काही लोक ओंडक्यासारखे कडक असतात की त्यांना खाली वाकता येत नाही, खाली बसले तर लवकर उठता येत नाही. साठ वर्षांनंतर सेवानिवृत्त होणारे तीस-चाळीस वर्षांत सेवानिवृत्त व्हायला लागले. कारण काही नाही होणार म्हणणारी आता वेळ देत नाही आणि दवाखान्यात भरती झाल्यावर मरणापासून सुटका मागतात. आता वेळ आहे, जागे होण्याची, प्रत्येक पानावर घरगुती उपाय मनावर द्यायची गरज आहे.

******

## नाशिक औष्णिक विद्युत केंद्रातील श्री. योगेश कापडणीस यांना पोलिस कोरोना योध्दा पुरस्काराने सन्मानित

नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, एकलहरे येथील सुरक्षितता विभागात कार्यरत श्री. योगेश कापडणीस - तंत्रज्ञ-१ ह्यांनी कोरोना (कोविड-१९) चे प्रमाण सर्वत्र वाढले असताना नाशिक शहर लॉकडाऊन करण्यात आले होते. त्या दरम्यान 'एक हात मदतीचा' म्हणून सामाजिक बांधिलकीच्या अंतर्गत शहरातील विधवा, दिव्यांग, गोरगरीब गरजू कुटुंबास निराधार व्यक्तींना अन्नधान्य, किराणा साहित्य वाटप केले. कोरोनाचा प्रादुर्भावात महानिर्मिती कंपनीतील अधिकारी / कर्मचारी यांना मेडिकल पॉलिसीदरम्यान दवाखान्यात योग्य तो समन्वय साधून एकूण ५१ महानिर्मिती कंपनीतील अधिकारी / कर्मचारी यांना कोरोना (कोविड-१९) बाबत सुविधा भ्रमणध्वनीद्वारे वेळोवेळी प्राथमिक मदत करुन समन्वय साधण्यात आला. नाशिक औ.वि. केंद्रातील अधिकारी, कर्मचारी, मेस्को गार्ड, नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक तसेच कंत्राटी कामगार यांना मास्क, सॅनिटायझर वाटप करण्यात आले.

सदर कर्मचारी यांनी आपले अत्यावश्यक सेवेत काम करत असताना, वेळेनुसार नाशिक पोलिस स्टेशन अंतर्गत पोलिसांसोबत विशेष पोलिस अधिकारी या पदावर बंदोबस्त, पेट्रोलियम अशा विविध स्वरुपात कामे करुन जनतेला कोरोना (कोविड-१९) पासून जागरुकता निर्माण केली, या अनुषंगाने नाशिक पोलिस आयुक्त मा.श्री. विश्वास नांगरे पाटील यांच्या हस्ते 'पोलिस कोरोना योध्दा पुरस्कार' देऊन सन्मानित केले.

## पडता है...

।। सीर पर अब बाल कम रह गये,
फिर भी कंगी से सँवारना पडता है ।।
।। जवानी की वो तस्वीरें देख कर,
मन ही मन मुस्कराना पडता है ।।
।। बीबी चाहे कई बार रुठ जाए,
फिर भी उसे मनाना पडता है ।।
।। बॉस चाहे कितना कितना भी डाटे,
जिम्मेदारियों को याद करके मन को समझाना पडता है ।।
।। जवानी में भी क्या तेवर थे,
वो याद करके आगे बढना पडता है ।।
।। रुकना नहीं, थकना नहीं,
चलना ही जिंदगी है, चलते रहना पडता है ।।
।। कोई चाहे कुछ भी कहे,
हमेशा अपने दिल की सुनना पडता है ।।
।। अरे... दिल को कभी टटोल के तो देखो,
खुशियों का खजाना दिखाई पडता है ।।
।। कभी रिश्तें निभाने के लिए झुकना पडता है,
तो कभी अपने हक के लिए झगडना पडता है ।।
।। कभी गम में मुस्कराना पडता है,
तो कभी खुशी में रोना पडता है ।।
।। बालों का झडना ते अब भी जारी है, दोस्तों...
बस थोडासा झटकना पडता है ।।
।। अब हम बुढापे की ओर जा रहे है...
बस यही दिल को समझाना पडता है... ।।

**- आशिष ईखनकर**
अभियंता (कोराडी प्रशिक्षण केंद्र),
नागपूर.





## रावण खरंच संपला का ?

रावणाचा द्वेष करता
विचार पडतो मला
रावण खरच संपला
का मानवात उतरला

त्याच्या पुतळ्याचे दहन
करतात मानव सर्व
त्या एकट्याला का
मानवा मानवात गर्व

तोच व्यभिचारी होता
मानव स्त्री छळती वारंवार
राम किती लागतील
संपवण्या स्त्रीला द्या आधार

खरा भक्त होता पण
अहंकार अन् वाईट नजर
त्याला संपवले घाव
करता कुण्या काळजावर.

**- राजेश लक्ष्मण वऱ्हाडे**
एम.आय.एस. विभाग,
पारस औष्णिक वीज केंद्र

## परळी औष्णिक विद्युत केंद्राचा सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिन उत्साहात संपन्न






क्षणचित्रे





परळी औष्णिक विद्युत केंद्राचा सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिनानिमित्त आंतरगृह व बाह्यगृह क्रीडा स्पर्धा तसेच मॅरेथॉन स्पर्धा, आनंद मेळावा, महिलांसाठी रांगोळी व हस्तकला प्रदर्शन यांसारखे शैक्षणिक, सांस्कृतिक उपक्रम आणि पारितोषिक समारंभ मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले, त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे. सदर वर्धापन दिनी औ.वि. केंद्रातील अधिकारी-कर्मचारी-महिला कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी तसेच वसाहतीतील रहिवाश्यांनी आणि मुला-मुलींनी सहभाग घेतला. पारितोषिक वितरण समारंभावेळी संचालक (संचलन) मा.श्री. चंद्रकांत थोटवे, मुख्य अभियंता (भांडार) मा.श्री. राजेश मोराळे आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.





क्षणचित्रे





## परळी औष्णिक विद्युत केंद्राचा सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिन उत्साहात संपन्न झाला, त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे



क्षणचित्रे















क्षणचित्रे








# गौरव - अभिनंदन



फ्रान्स येथील 'ऑडक्स सायकलिंग क्लब' च्या वतीने संपूर्ण जगात विविध देशांमध्ये राँदेनिअर्स ब्रेव्हेट (BRM) साहसी सायकलिंग स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. भारतात देखील 'ऑडक्स इंडिया राँदेनिअर्स' क्लबद्वारे अश्या प्रकारच्या सायकलिंग स्पर्धा मोठमोठ्या शहरांमध्ये घेण्यात येतात. सदर स्पर्धेला शंभर वर्षे पूर्ण झाल्याने शतक वर्षपूर्तीनिमित्त नागपूर राँदेनिअर्स क्लबच्या वतीने १२ सप्टेंबर रोजी उपराजधानीत झिरो माईल्सपासून मध्यप्रदेशातील पीपलपाणी व तेथून परत नागपूर झिरो माईल्सपर्यंत २०० किलोमीटर स्पर्धेत महानिर्मितीचे कोराडी येथे कार्यरत सहाय्यक कल्याण अधिकारी श्री. दिलीप वंजारी, कोराडी स्थापत्य प्रकल्प विभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. रवींद्र पांढरे तसेच चंद्रपूर येथे कार्यरत सहाय्यक अभियंता श्री. संभाजी बडगुजर यांनी या स्पर्धेत सहभागी होऊन निर्धारित १३.३० तासाच्या वेळेआधी ८ तासांत २०० किलोमीटर पूर्ण केली.



कोराडी प्रशिक्षण केंद्र, कोराडी येथे कार्यरत असलेले अतिरिक्त कार्यकारी अभियंता डॉ. किशोर अमृतराव सगणे यांचा पाल्य कु. ईशान सगणे हा मॉडर्न स्कूल, कोराडी येथून २०२०-२०२१ या वर्षी संपन्न झालेल्या केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ, नवी दिल्ली (सी.बी.एस.ई.) (इयत्ता १०वी) परिक्षेत ९७.०० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाला.



भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र, दीपनगर येथे तंत्रज्ञ-३ या पदावर कार्यरत असलेले श्री. मिलिंद सुभाष पाटील याची पाल्या कु. केयुरी हिने उच्च माध्यमिक शालांत परिक्षेत (इयत्ता १२वी, विज्ञान शाखा)९८% गुण मिळवून ती नाहाटा महाविद्यालयातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली.



Kum. Nikita Bhushanwar has secured 100% in S.S.C. Board Exam in March 2021. Kum. Nikita is the daughter of Shri. Sanjay Mahadeorao Bhusanwar, who is working as a Technician at Boiler Maintenance Section, 3x660 MW in Koradi TPS.



पारस औ.वि. केंद्रात तंत्रज्ञ-३ या पदावर कार्यरत असलेल्या सौ. शारदा मोहन भोंडे यांची पाल्या कु. ऋतुजा ही माध्यमिक शालांत परिक्षेत (इयत्ता १०वी) ९२.२०% गुण मिळवून उत्तीर्ण झाली.

Shri. Rahul Sakhare run PhD. in Engineering field at Purdue University in USA. His total 9 Citation Research paper published in various journals, 6 papers in Indian Journals and 3 papers in American Journals. Shri. Rahul is the son of Shri. S.B. Sakhare who is working as a Technician-I in Parli Thermal Power Station.

**दोन्ही वृत्तात नमूद आपल्या माजी कर्मचारी यांच्या गौरवाचाही महानिर्मितीला अभिमान वाटतो**



सिंगापूर मास्टर्स ट्रॅक ॲण्ड फिल्ड असोसिएशन चॅम्पियनशिप या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत तानाजी सखाराम भोर (६२) यांनी सहभाग घेऊन भारताचे प्रतिनिधीत्व केले. बीबी नं. एम-६६०७ या स्पर्धेत ४०० मीटर रनिंगमध्ये सिल्व्हर, ८०० मीटरमध्ये सिल्व्हर, ४ बाय ४०० रिले रनिंगमध्ये ब्राँझ मेडल असे एकूण ३ मेडल्स भारतासाठी मिळविले. या स्पर्धेत जपान, ऑस्ट्रेलिया, ब्रुनी, इंडोनेशिया, हाँगकाँग, मलेशिया, सिंगापूर, अमेरिका, चीन, भूतान हे ११ देश सहभागी झाले होते. या स्पर्धा ६ए ७ जुलै २०२१ रोजी कलिंगा स्टेडियम, सिंगापूर येथे झाल्या.




श्री. सुरेश रेवतकर, माजी लघुलेखक, चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र यांना पुरस्कृत देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात नागपुरातील ७५ जेष्ठांचा तसेच स्वातंत्र्य सैनिक व विविध क्षेत्रातील ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाच्या निमित्ताने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे मुख्य उपस्थितीत उत्कृष्ट ज्येष्ठ नागरिक पुरस्कार देण्यात आला.

कामगार कल्याण विभाग, महाराष्ट्र शासनातर्फे श्री. रेवतकर यांना यापूर्वी कर्तबगार कामगार २००० व गुणवंत कामगार २००० हे पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यांना यापूर्वी अल्पबचतीकरिता जिल्हाधिकारी, चंद्रपूर व राष्ट्रीय बचत योजना, भारत सरकारतर्फे पुरस्कृत करण्यात आले.

चंद्रपूर महाऔ.वि. केंद्रात कार्यरत असताना त्यांनी कल्याण समिती स्थापन करुन विविध उपक्रम कर्मचाऱ्यांकरिता व गरीब शाळकरी मुलांकरिता आजुबाजूच्या विद्युत केंद्राच्या सभोवताली खेड्यात राबविले. सध्या ते ज्येष्ठांच्या विविध योजना राबविण्याकरिता पाठपुरावा करीत आहेत.

# जयंती - पुण्यतिथी



खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातील सौदामिनी प्रशासकीय ईमारत येथे मुख्य अभियंता मा.श्री. राजू घुगे यांच्या अध्यक्षतेखाली स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित कर्मचारीवृंद.




पारस औष्णिक विद्युत केंद्रातील पारसदीप प्रशासकीय इमारतीसमोरील प्रांगणात मुख्य अभियंता मा.श्री. मा.श्री. विठ्ठल खटारे यांच्या अध्यक्षतेखाली राजे उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित कर्मचारीवृंद.



भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रातील शक्तीगड प्रशासकीय ईमारत येथे प्रभारी मुख्य अभियंता मा.श्री. नितीन पुणेकर यांच्या अध्यक्षतेखाली साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित कर्मचारीवृंद.



खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातील सौदामिनी प्रशासकीय ईमारत येथे उप मुख्य अभियंता -१ मा.श्री. शरद भगत यांच्या अध्यक्षतेखाली अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित कर्मचारीवृंद.



खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातील सौदामिनी प्रशासकीय ईमारत येथे मुख्य अभियंता मा.श्री. राजू घुगे यांच्या अध्यक्षतेखाली वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.




नाशिक औष्णिक विद्युत केंद्रातील प्रशासकीय ईमारत येथे मुख्य अभियंता (प्रशासन) मा.श्री. एन.एम. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली राजे उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.




पारस औष्णिक विद्युत केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. मा.श्री. विठ्ठल खटारे यांच्या अध्यक्षतेखाली बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.



खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातील सौदामिनी प्रशासकीय ईमारत येथे मुख्य अभियंता मा.श्री. राजू घुगे यांच्या अध्यक्षतेखाली महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.

# जयंती - पुण्यतिथी



महानिर्मिती मुख्यालय, प्रकाशगड येथे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.श्री. संजय खंदारे यांचे हस्ते डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांच्या जयंतीप्रित्यर्थ अभियंता दिन साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी वरिष्ठ संचालक व अन्य मान्यवर उपस्थित होते.



कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातील ऊर्जाभवन ईमारत येथे अधीक्षक अभियंता (प्रशासन) श्री. जे.बी. पवार यांच्या अध्यक्षतेखाली केशव सीताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अधिकारी.




पारस औष्णिक विद्युत केंद्रातील पारसदीप प्रशासकीय इमारतीसमोरील प्रांगणात मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे यांच्या अध्यक्षतेखाली केशव सिताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित कर्मचारीवृंद.



नाशिक औष्णिक विद्युत केंद्रातील प्रशासकीय इमारत, एच.ओ.डी. हॉल येथे मुख्य अभियंता (प्रशासन) मा.श्री. एन.एम. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पंडित दिनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित कर्मचारीवृंद.



नाशिक औष्णिक विद्युत केंद्रातील प्रशासकीय ईमारत येथे मुख्य अभियंता (प्रशासन) मा.श्री. एन.एम. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली केशव सिताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित कर्मचारीवृंद.




पारस औष्णिक विद्युत केंद्रातील पारसदीप प्रशासकीय इमारतीसमोरील प्रांगणात मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे यांच्या अध्यक्षतेखाली पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित कर्मचारीवृंद.



पारस औष्णिक विद्युत केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे यांच्या अध्यक्षतेखाली पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद व महिला कर्मचारी.



नाशिक औष्णिक विद्युत केंद्रातील प्रशासकीय इमारत, एच.ओ.डी. हॉल येथे मुख्य अभियंता (प्रशासन) मा.श्री. एन.एम. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादुर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित कर्मचारीवृंद.

# जयंती - पुण्यतिथी - दिन विशेष






पारस औष्णिक विद्युत केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे यांच्या अध्यक्षतेखाली संविधान दिन संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद यांचेसोबत संविधान उद्देशिकाचे वाचन करण्यात आले, त्याप्रसंगीचे ही छायाचित्रे.




पारस औष्णिक विद्युत केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. मा.श्री. विठ्ठल खटारे यांच्या अध्यक्षतेखाली महर्षी वाल्मिकी ऋषी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.



नाशिक औष्णिक विद्युत केंद्रातील प्रशासकीय ईमारत येथे उप मुख्य अभियंता श्री. गजानन गावंडे यांच्या अध्यक्षतेखाली राजीव गांधी यांच्या जयंतीप्रित्यर्थ सद्भावना दिवस संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.



भुसावळ औ. वि. केंद्रातील शक्तीगड प्रशासकीय ईमारत येथे प्रभारी मुख्य अभियंता मा.श्री. नितीन पुणेकर यांच्या अध्यक्षतेखाली क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.



पारस औष्णिक विद्युत केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा गांधी व लाल बहादुर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.





पारस औष्णिक विद्युत केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे यांच्या अध्यक्षतेखाली इंदिरा गांधी व सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद आणि महिला कर्मचारी यांनी प्रतिज्ञा वाचन केले.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे एकदिवसीय मार्गदर्शन शिबिराचे आयोजन





पारस औष्णिक विद्युत केंद्रात महाराष्ट्र कामगार मंडळाच्या प्रतिनिधी सौ. वैशाली नवघरे, कामगार कल्याण अधिकारी, अकोला शहर यांनी वीज केंद्रातील कंत्राटदारांना तसेच कामगारांना महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांबद्दल माहिती विशद केली, त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.



महानिर्मिती अधिकारी वसाहत, कुर्ला येथे सहाय्यक जनसंपर्क अधिकारी श्री. संतोष पुरोहित यांनी सोशल मिडिया जागरुकतेबाबत व्याख्यान दिले, त्याप्रसंगी त्यांचे स्वागत करताना मुख्य महाव्यवस्थापक मा.श्री. आनंद कोंत आणि तत्कालीन मुख्य अभियंता (तांत्रिक) मा.श्री. भागवत.



अभिनय कट्टा, कोराडी औष्णिक विद्युत केंद्र, कोराडीतर्फे खासदार एकांकिका स्पर्धेत झलकारी या एकांकिकेला रंगभुषाचे प्रथम पारितोषिक मिळाले, मा.ना.श्री. नितीनजी गडकरी आणि सिने अभिनेत्री सुकन्या कुलकर्णी यांचे हस्ते पारितोषिक स्वीकारताना माधवी जाभुळकर.

## *Environmental Protection Steps taken by Khaperkheda TPS*





Unutilized Fly Ash from TPS is disposed and collected at Ash bund. In order to contain the dispersion of Ash from bund, suppression barrier is to be provided along the periphery of ash bund. Catering this cause, Khaperkheda TPS has undertaken plantation of Bamboo Sapling around the periphery of bund. Till date 19650 bamboo saplings have been planted around the periphery of Waregaon Ash Bund, Khaparkheda.





# INDUCTION OF ADVANCED FIRE FIGHTING VEHICLES (FIRE TENDERS) AT MAHAGENCO'S POWER PLANTS

## PARAS TPS






## BHUSAWAL TPS






## CHANDRAPUR STPS








## किमया

एक दिवस त्यानं तिची थट्टा केली
अन् नाहक बिचारी माझ्यावर रुसली...
कळलंच नाही तो कुठून कसा आला
जोरात धडकून तिला पळत सुटला...
नुसताच पळाला नाही
तिची छत्री आणि ओढणी घेऊन गेला...
बिचारी साधी भोळी
वेड्यासारखी नुसती पाहत राहिली...
तोपर्यंत दुसऱ्यानं तिला
केसांपासून ते पायांपर्यंत भिजवून काढली...
तिला भिजलेली पाहून
माझ्या मनातल्या मोरानं पिसारा फुलवला...
तिच्या चाणाक्ष नजरेनं
माझ्या मनातला खेळ पुरता ओळखला...
तीही बिचारी उबेसाठी
भररस्त्यात माझ्या मिठीत शिरली...
ही सारी किमया
त्या वाऱ्यानं आणि पावसानं केली...

**- अमोल कांबळे (संघमित्रा)**
कनिष्ठ लिपिक (मा.सं.),
कोयना. ज.वि. केंद्र, पोफळी.

## हल्ली जगभरात रंग खेळतो

हल्ली जगभरात रंग खेळतो
कोरोना घरोघरी ।
बंधु भगिनींनो घरातच बसा
नका निघू बाहेरी ।। धृ।।

सर्दी खाँसी ताप अंगदुखी
सौम्य पाऊली तो येतो ।
पाहता पाहता घसा पकडे
अन् श्वासच गोठतो ।
नका लागू बरं त्याचे नादी
जपून रहा अपुल्या घरी ।
बंधु भगिनींनो घरातच बसा
नका निघू बाहेरी ।। १ ।।

भल्या भल्या विद्वानांनी
त्यास हात टेकले ।
कुणा न सापडे नाळ त्याची
कैक प्राणांस मुकले ।
उडवली घाबरगुंडी त्याने
कुणी ना खट्याळ त्यापरी ।
बंधु भगिनींनो घरातच बसा
नका निघू बाहेरी ।। २ ।।

मास्क, अंतर, स्वच्छता मित्रांची
म्हणजे तो लाज राखतो ।
गैरत्रिसुत्री स्वैराचाऱ्यास पाहता
त्यास चेव लई चढतो ।
भारतीय म्हणून भाग्य तुमचं
शासनाची लस घ्या खांद्यावरी ।
बंधु भगिनींनो घरातच बसा
नका निघू बाहेरी ।। २ ।।

नको माजू माणसा, सांगतो
तुझ्या औकातीत रहा ।
निसर्गाप्रती कृतज्ञ रहा तू
मानवतेस झुकून रहा ।
कोरोना होता रक्तनात्यांचाही
ना पडे हात तुझ्यावरी ।
बंधु भगिनींनो घरातच बसा
नका निघू बाहेरी ।। ३ ।।

हल्ली जगभरात रंग खेळतो
कोरोना घरोघरी ।
बंधु भगिनींनो घरातच बसा
नका निघू बाहेरी ।। धृ।।

**- योगेश कापडणीस**
तंत्रज्ञ-१,
नाशिक औ.वि. केंद्र



# बाबा नाही विसरली मी

हे काय केलेस तू
तोडली ना स्वप्ने सारी
विश्वासाच्या धाग्याला
तुझे वागणे पडले भारी

नाही भेटायचे आजपासून
तुमची वाट चुकीची
उगाच पिकलेल्या प्रेमाला
साथ नसते गं मुळाची

खरंच आमचे प्रेम विरळ
की आमचे संस्कार
फुलण्याच्या तुझ्या गोड स्वप्नाला
का काट्याचा आधार

कशी दिसली ती वाट
का हरवलीस तू
तुझ्या बाबाच्या प्रेमाला
कशी विसरलीस तू

बाबा नाही विसरली मी
काळजीचे तुझे झाड
तुझ्या काळजाच्या घरातून
बोबड्या शब्दांचे ते लाड

बाबा नाही विसरली मी
पहिले तूच घेतले ना हाती
किव किव करणाऱ्या मला पाहून
तुझ्या डोळ्यांत साठलेले कैक मोती



बाबा नाही विसरली मी
शाळेत जाताना हाती तुझ्या हाताची कडी
गणितातल्या शून्य घरी आणल्याने
त्याच हाताने पडलेली छडी

बाबा नाही विसरली मी
त्या दिवशी रडून सुकलेला माझा गळा
एका कोपऱ्यातून मला हळूच पाहताना
रात्रभर तुझ्या डोळ्याला ना डोळा

बाबा नाही विसरली मी
तू भरवलेले चिमुकले घास
परिस्थितीच्या डोहात जळतानाही
तुला आमच्याच सुखाचा ध्यास

बाबा नाही विसरली मी
तू दिलेले सर्व काही
तुझ्या प्रेमाची कूस इतकी मोठी
शब्दांत पुरेल हे शक्यच नाही

पण काय करु रे
पडली त्याच्या प्रेमात
हरवलेच रे मी
त्याच्या काही स्वरात

कळलेच नाही रे तेव्हा
मी का प्रेमात बुडाली
त्याच्या हळूच हसण्याने
पंख नसताना उडाली

बाबा नाही इतका वाईट तो
मन त्याचे भावनांची खोली
चालताना सोबत त्याच्या
दिसते तुझीच सावली

तुझ्यासारखीच स्वप्ने त्याची
मुखी कष्टाची साखर
प्रयत्नाने किर्तीचा सुगंध
तरीही डोळ्यांत शांत सागर

तो नेहमी सांगतो
कोणी कधीच नाही सुखी
ज्याने स्वत:साठी केली
घरच्या संस्कारांची माती

बाबा छानच आहे तो
प्रेम करतो ही फार
पण प्रेमाच्या हलत्या तराजूत माझ्या
तुझ्याच प्रेमाचा भार

तू इतके दिले
भरपाईत आयुष्यही लहान
तुझ्या एका सुखासाठी
असे कैक सुख कुर्बान

बाबा विसरेल मी त्याला
दूर ठेवील ती वाट
आजच्या या रात्रीनंतर
माझ्या प्रेमाला न कधी पहाट

बाबा फक्त नको पाहू डोळ्यांत
लाल दिसतील थोडे
काळाच्या नव्या ओळीने
सुटतील सर्व कोडे

**- प्रवीण दिलीप भोईर**
व्यवस्थापक (वित्त व लेखा),
सांघिक कार्यालय, मुंबई.

# दिवस आपले कोरोनाचे

दिवस आपले हे कोरोनाचे ।
नुसतेच सोफ्यावर लोळायचे ।। धृ ।।

घरातच गुंतून राहणे । सोबतीला बातम्यांचे रडगाणे ।
रडगाण्याने पिळवटून जायायचे ।। १ ।।

मोजावी ऑक्सिजनची खोली । घालावी सुंठ आणि मिरी ।
त्याचेच पाणी घशात ओतायचे ।। २ ।।

कंटाळली कोंडलेली पोरं । सोसेना मास्कचा भार ।
बाहेर पोलिसांनी काठीने मारायचे ।। ३ ।।

मी माझ्याच घराशी । थांब तू गडे तुझ्याच घराशी ।
नुसतेच फोनवर बोलायचे ।। ४ ।।

(क्षमस्व कवीश्रेष्ठ मंगेश पाडगांवकर)

**- दिनेश पवार**
वरिष्ठ लिपिक, सां.नि. व सु. विभाग,
सांघिक कार्यालय, मुंबई





# तुम...

जब जब अकेला रहता हू,
तब तुम्हारी याद बैचेन करती है ।

तुम्हारे कमल जैसे ओंठ,
आँखों कि नींद उडा देती है ।

तुम्हारे गालों की खुशबु,
मेरी साँसे चुरा लेती है ।

तेरे लब्ज जब भी याद आते है,
तो मेरी खामोशी और भी बढती है ।

लेकिन वक्त याद दिलाता है,
अब उम्र बढ रही है,
और तेरा प्यार जवाँ होने लगा है...

**- अमोल कांबळे (संघमित्रा)**
कनिष्ठ लिपिक (मा.सं.),
कोयना. ज.वि. केंद्र, पोफळी.

## बरं झालं कोरोना आला...

- मारुती निवृत्ती जाधव
व्यवस्थापक (मा.सं.), प्रकल्प व नियोजन विभाग,
सांघिक कार्यालय, मुंबई.



...काय आश्यर्च वाटलं ना. अहो! खरंच गणपती बाप्पा म्हणाले, अहो आपल्या सगळ्यांचा लाडका आवडता गणपती बाप्पा.

गणेशोत्सवात मोठमोठ्याने घसा ताणून ओरडत असताना माझ्या नावाने 'मोरया मोरया... पुढच्या वर्षी लवकर या...' म्हणून आलो लवकरच, पण बरं झालं कोरोनासारखी महामारी आली. त्यामुळे तुम्ही माझी साधी पण भक्तीभावाने पूजा करुन मला निरोप देऊ लागलात.

नाहीतर काय तो उत्साह, काय तो तमाशा, काय तो हैदोस आणि धांगडधिंगा. माझ्या नावाने वर्गणी तर अशी मागता जसं काही खंडणीच वसूल करता. मला बुध्दीची देवता मानता ना मग थोडी बुध्दी वापरा ना. माझे आधीच कान मोठे, मग सांगा मला त्या लाऊडस्पीकर, डी.जे. चा किती त्रास होत असेल? अरे, त्या वयोवृध्द आणि लहान बालकांचा तरी विचार करा रे. आजारी माणसांना तुमच्यामुळे खुप मानसिक त्रास सहन करायला लागतो. मी आल्याचा आनंद त्यांना पण होतोय पण तुमच्या या आवाजामुळे त्यांना मी न आलेलाच बरं, असं वाटतं.

वर्गणी गोळा करुन त्यामधून दारुच्या पार्ट्या करता, माझ्या मिरवणुकीत अंग वेडंवाकडं करुन बीभत्स नाचणं... डोळे बंद करुन घेतो रे मी आणि पुन्हा वरुन मलाच दम देता, पुढच्या वर्षी लवकर या...!

मला तर वाटतं, पुढच्या वर्षी नव्हे तर परत कधीही न येण्याचा निश्चयाने, पण असं म्हणत परत येतो दरवर्षी... माझ्या बोटावर मोजण्याइतक्या भक्तांसाठी.

आणखी विशेष... जवळपास सर्वच माझ्या दर्शनासाठी येतात असे नाही तर सजावट, आरस, देखावाही बघायला येतात. काही तरुण मुले-मुली तर सांगायलाच नको बाबा.

मग रस्ते जाम, पोलीस बंदोबस्त, चेंगराचेंगरी, मवाली, पाकिटमारी, गुंडाचा संधीसाधूपणा, शिव... शिव... शिव... त्या टिळकांना सुध्दा पश्चाताप होत असेल हे सारं पाहून. दहा दिवस माझे एवढं कौतुक करता, मोदक काय, आरत्या काय, हार-तुरे पण पुन्हा मात्र वर्षभर साधं माझं नाव सुध्दा काढत नाहीत.

पण बरं झालं माणसे माणसांत आली आणि या सर्वांमधून माझी सुटका झाली. ना मिरवणुक, ना आरतीला होणारा गोंधळ, ना ट्रॅफिक, सगळं कसं शांत... शांत... फक्त मनोभावे पुजाअर्चा...

******

## नाशिक औष्णिक विद्युत केंद्रात सरदार वल्लभभाई पटेल जयंती आणि इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी संपन्न

दि. ३१ ऑक्टोबर २०२१ रोजी सकाळी नाशिक औ.वि. केंद्रातील प्रशासकीय इमारत एच.ओ.डी. हॉल येथे सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती तसेच इंदिरा गांधी यांची पुण्यतिथीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नाशिक औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. एन.एम. शिंदे उपस्थित होते.

सदर कार्यक्रमात सरदार वल्लभभाई पटेल आणि इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन त्यांच्या जीवनकार्याबद्दल सविस्तर माहिती उपस्थितांना विषद करुन राष्ट्रीय संकल्प दिवस शपथ घेण्यात आली.

सदर कार्यक्रमाकरिता वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी व महिला कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन लघुलेखक श्री. अनिल कांबळे यांनी केले.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात स्वातंत्र्य दिन संपन्न

दि. १५ ऑगस्ट २०२१ रोजी सकाळी पारस औष्णिक विद्युत केंद्रातील पारसदीप प्रशासकीय इमारत येथे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे तर प्रमुख उपस्थिती म्हणून प्रभारी उप मुख्य अभियंता श्री. ज्ञानेश्वर दामोधर हे होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस मुख्य अभियंता मा.श्री. खटारे यांचे शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले आणि स्वातंत्र्यसेनानी यांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर पारस औ.वि. केंद्रातील वाहनचालक श्री. चंद्रकांत मासरे, श्री. नरेश गायकवाड, श्री. शेख इरफान व श्री. श्रीकृष्ण कलोरे या सर्वांचा सुरक्षित वाहन चालविल्याबद्दल तसेच वाहतुकीच्या नियमांचे काटेकोर पालन केल्याबद्दल रोख बक्षिस देऊन सत्कार आला.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन कल्याण अधिकारी श्री. मयुर मेंढेकर यांनी केले.

# सजावट

- श्री. संतोष पुरोहित,
सहाय्यक जनसंपर्क अधिकारी,
जनसंपर्क कक्ष, मुख्यालय, मुंबई



सकाळी ऑफिसला जाण्यासाठी गाडीला किक मारली. पावसाने आता पुर्ण विश्रांती घेतली होती व सकाळी धुक्याचे साम्राज्य सुरु झाले होते. नेहमी प्रमाणे पेपर घेण्यासाठी थांबलो. स्टॉल मोकळा सोडून काका कुठेतरी बाजूला गेले होते. सहज लक्ष समोरील बस स्टॉपकडे गेले. आपल्या उजव्या खांद्यावरील झोळीत असलेले लहान मुलाचे टक्कल असलेले डोके योग्य प्रमाणात बाहेर ठेवत, त्या मुलाची रचना करत एक भिकारीण उभी होती. बहुतेक ते मुल झोपलेलंच असावे. तेवढे झाल्यावर तिने स्वत:च्या कपड्यांकडे नजर फिरवली. आपण बाहेर जाताना जसे कपडे ठिकठाक आहेत ना हे पाहतो, तसे तिने आपले दारिद्र्य योग्य रितीने दिसते आहे ना याची खात्री केली असावी. एवढं सगळं झाल्यावर डाव्या खांद्यावर आणखी एक झोळी लटकवत भीक मागण्यासाठी ती सज्ज झाली. तिची ती तयारी बघितली नी मनात विचार आला, भीक मागण्यासाठी आवश्यक अशी ती एक सजावट होती. तिच्याकडे बघून कोणाला दया आली तरच तिला भीक मिळणार होती. काकांची वाट पाहून पुन्हा गाडी सुरु केली व मनामध्ये विचार आला रोजच्या जीवनामध्ये आपण अशा अनेक सजावटी बघत असतो. आधी पोटोबाच्या न्यायाने डोळ्यांसमोर पहिला आला आमचा भाजीवाला.

वांगी, भेंडी, मुळा, सुरण, बीट, गाजर, मिरची, कोथिंबीर द्या. सर्व भाज्यांची मांडणी अशी केलेली असते की, त्याच्या स्टॉलकडे लक्ष जातेच. नीट एकमेकांवर ठेवलेल्या भाज्या, त्यांची रंगसंगती सर्व काही मन लावून केलेले. सध्याच्या महागाईच्या काळात ४ पैकी १ वांगं हमखास जुन्या शिल्लक मालातील तागडीत टाकूनही, घरची ओरड ऐकूनसुध्दा माझ्यासारखे अनेक जण हमखास तिथेच भाजी घेतात. फुटपाथवरील माल विक्रेते केवळ सजावट व मांडणीच्या जोरावर आपला माल खपवत असतात.

बुधवार आणि रविवार हमखास भेट होते ती मित्रांबरोबर अब्दुलच्या माश्यांच्या स्टॉलची. तो ज्या पध्दतीने वेगवेगळे मासे कडप्पांवर मांडून ठेवतो ते बघण्यासारखे असते. एवढ्या मोठ्या ढिगातून मित्राला, 'साहेब, वेगळे ठेवले होते' म्हणत पापलेट, सुरमई सहज काढून देतो.

गेली अनेक वर्षे आणखी एक ठिकाणी मी हमखास जातो ते म्हणजे राजूची पानपट्टी. पुढे खाऊच्या बरण्या, काचेच्या कपाटात नीटपणे मांडलेली सिगरेटची पाकिटे, एका बाजूला वेगवेगळ्या तंबाखूच्या डब्या. मसाला पान बनवण्यासाठीचे सर्व घटक एका ओळीमध्ये नुसते बघितले तरी पान खावंसं वाटावं अशी रचना. बऱ्याच वर्षांनी हल्ली त्याने मला सांगितले की, ह्यातली निम्मी पाकिटे व तंबाखुच्या डब्या रिकाम्याच असतात, पण कपाटे भरलेली दिसल्याशिवाय गिऱ्हाईक येत नाहीत म्हणे.

आजकाल कपड्यांच्या दुकानामध्ये वा शो-रुममध्ये कपड्यांची मांडणी अशा पध्दतीने केलेली असते की, आपण मोहात पडून खरेदी करतो. तिथे मॉडेलला घातलेले टी-शर्ट मी घातल्यावर चांगले दिसत नाहीत हे माहीत असूनही मी पुन्हा पुन्हा खरेदी करतोच.

अशा अनेक गोष्टी केवळ सजावटीमुळे आपणाशी निगडीत असतात पण आमच्यासारखे नोकरी करणारेही रोज सजावट करत असतात की, फक्त आमच्याजवळ मांडण्यासाठी असतात शब्द. घरी बायकोबरोबर, रजा न मिळाल्यामुळे गावी येता येत नाही हे सांगताना आई-वडिलांबरोबर, सिग्नल चुकवल्यावर पोलिसांबरोबर, ऑफिसमध्ये बॉसबरोबर, मालकाबरोबर, कर्जाला जामीन रहा म्हणून सांगण्यासाठी मित्रांबरोबर, एक ना अनेक सजावटी करुन आपणही रोज मार्ग काढतोच ना ?

******

## नाशिक औष्णिक विद्युत केंद्रात कोविड-१९ लसीकरण उपक्रम संपन्न

नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, एकलहरे येथे दवाखान्यात लसीकरणाची मोहीम हाती घेण्यात आली.

सदर प्रसंगी नाशिक औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. नवनाथ शिंदे यांनी मार्गदर्शन करुन वसाहतीतील ४५ वर्षांवरील जास्तीत जास्त कर्मचारीवृंद व कंत्राटदार यांचे अखत्यारित असलेले कंत्राटी कामगार यांना लस घेण्याचे आवाहन केले. वसाहत परिसरात लसीकरण केंद्राची सुरुवात झाल्यामुळे सर्व अधिकारी-कर्मचारी यांनी समाधान व्यक्त केले.

याप्रसंगी नाशिक औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. नवनाथ शिंदे, उप मुख्य अभियंता (प्रशासन) श्री. गजानन गावंडे, अधीक्षक अभियंते सर्वश्री. एस.व्ही. वाघमारे, एस.डी. चव्हाण, वैद्यकीय अधीक्षक डॉ. फैझान खान, कार्यकारी अभियंता श्री. अतुल सोनजे, सी.एच.ओ. डॉ. किरण गायकवाड, आरोग्य सहाय्यक श्री. सतीश अहिरराव, श्री. राहुल पैठणे (एम.पी.डब्ल्यु.), कल्याण अधिकारी श्री. निवृत्ती कोंडावले तसेच दवाखाना कर्मचारी वर्ग आणि लस घेणारे लाभार्थी उपस्थित होते.

## पावसाळ्यात कोळसा टंचाईच्या पार्श्वभूमीवर आवश्यक वीजनिर्मितीसाठी महानिर्मितीमार्फत केले गेलेले प्रयत्न

महानिर्मिती कंपनी ही देशातील औष्णिक स्थापित क्षमतानिहाय दुसऱ्या क्रमांकाची वीजनिर्मिती कंपनी असून तिची सध्याची एकूण स्थापित क्षमता १३,१८२ मेगावॅट इतकी आहे. गेल्या सुमारे दीड वर्षांपासून विशेषत: कोरोना काळातील लॉकडाऊन कालावधीमध्ये अतिशय प्रतिकुल परिस्थितीमध्ये महानिर्मितीने सातत्यपूर्ण व विक्रमी वीजनिर्मिती साध्य केली. राज्यातील वीजग्राहकांना या काळात पुरेसा वीजपुरवठा शक्य होण्यात महानिर्मितीचा मोठा वाटा आहे.

सरासरी सुमारे ७०% भारांक राखण्यासाठी महानिर्मितीच्या सर्व औष्णिक संचांसाठी मिळून प्रतिदिन रेल्वेमार्गे सरासरी २२ रेक्सद्वारे व रस्ता वाहतुक – रोप–वेद्वारे एकूण सुमारे १०५००० मेट्रिक टन इतक्यान प्रमाणात कोळशाची आवश्यकता असते. महानिर्मितीला यापैकी सुमारे ६०% कोळसा मुख्यत्वे मे. वेस्टर्न कोलफिल्डस् लि. यांचेकडून तर उर्वरित कोळसा मे. एस.ई.सी.एल., मे. सिंगरानी कोल कॉलिअरीज लि. व मे. महानदी कोलफिल्ड लि. या कोळसा कंपन्यांकडून प्राप्त होत असतो. मात्र पावसाळ्यात काही कालावधीत अतिवृष्टी व परिणामस्वरुप कोळसा खाणीतील मंदावलेले कोळसा उत्पादन, कोळसा वहनातील समस्या यांमुळे महानिर्मितीला प्रत्यक्षात रेल्वेद्वारे साधारणत: प्रतिदिन १५ रेक्स तसेच रस्ता वाहतुक – रोप–वेद्वारे एकूण साधारण ७०,००० मेट्रिक टन इतक्याच प्रमाणात कोळसा प्राप्त होत होता. अर्थात, कोळसा टंचाईचे संकट हा विषय केवळ महानिर्मितीपुरता मर्यादित नसून मे. एन.टी.पी.सी. सह देशातील बहुतांशी वीजनिर्मिती कंपन्यांच्या उत्पादनात त्यामुळे घट झाली होती. देशात कोळसाटंचाईची परिस्थिती असूनही महानिर्मितीद्वारे प्रतिदिन सरासरी एकूण ४,५०० मेगावॅट औष्णिक वीजनिर्मिती करण्यात आली होती.

महानिर्मितीच्या एकूण महसुलापैकी सुमारे ८०% खर्च इंधनावर होत असतो. महावितरणला भेडसावणाऱ्या प्रचंड थकबाकीच्या समस्येमुळे कोळसा कंपन्यांचे देणे देण्यासाठी पुरेसा निधी महावितरणकडून उपलब्ध होत नसताना देखील यावर्षी पावसाळ्यापूर्वी १८ एम.एम.टी. इतक्या प्रमाणात कोळशाचा साठा करण्यात आला होता. तथापि, गेल्या काही महिन्यांत लॉकडाऊन उठवला गेल्यानंतर विजेच्या वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी या काळात महानिर्मितीने वायु व जल विद्युतसह प्रतिदिन सुमारे ७,००० मेगावॅट इतकी वीजनिर्मिती साध्य केली आणि ती गेल्या तीन वर्षांतील या काळातील सरासरी वीजनिर्मितीपेक्षा ३०%नी जास्त होती. अर्थात, या वाढीव वीजनिर्मितीमुळे कोळसा साठा कमी झाल्याने व नैसर्गिक आपत्तीमुळे कोळसा पुरवठा देखील मोठ्या प्रमाणात बाधित झाल्याने औष्णिक संचांचे संचलन करताना महानिर्मितीला कसरत करावी लागली. तरीदेखील, किमान तांत्रिक क्षमतेने बहुतांशी औष्णिक संच सुरु रहावेत यासाठी महानिर्मिती कसोशीने इंधन व्यवस्थापनाच्या माध्यमातून सतत प्रयत्नशील राहिली. शिखर मागणीच्या कालावधीत महावितरणला पुरेशी वीज पुरविता यावी यासाठी कोयना जल विद्युत केंद्र व उरण वायु विद्युत केंद्र यांतून जास्तीत जास्त वीजनिर्मितीसाठी महानिर्मिती सक्षम आहे व त्याप्रमाणे वीजनिर्मिती करण्यात आली.

कोळसा टंचाईतून मार्ग काढण्यासाठी सर्व स्तरावर निकराचे प्रयत्न केले गेले होते. मा. ऊर्जा मंत्री, महाराष्ट्र शासन हे सातत्याने केंद्रीय कोळसा मंत्री, केंद्रीय ऊर्जा मंत्री यांचेशी संपर्कात होते. कोळसा टंचाईची समस्या दूर करण्यासाठी कोळसा मंत्रालय, ऊर्जा मंत्रालय व रेल्वे मंत्रालय यांचेमध्ये दैनंदिन तत्वावर वरिष्ठ – सचिव पातळीवर व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारा संवाद होऊन परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी उपाययोजना सुरु होत्या. महानिर्मितीचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय खंदारे यांनीदेखील केंद्रातील कोळसा मंत्रालयाशी प्रत्यक्ष भेटीद्वारे संपर्क साधून राज्यातील कोळसा टंचाई समस्येचे गांभीर्य संबंधितांच्या निदर्शनास आणून दिले. त्याचप्रमाणे महानिर्मितीचे वरिष्ठ अधिकारी व अन्य कर्मचारी संबंधित कोळसा खाण परिसरात उपस्थित राहून जास्तीत जास्त कोळसा प्राप्त व्हावा यासाठी प्रयत्नशील होते. त्यावेळची निकड लक्षात घेता मे. वेस्टर्न कोलफिल्डस् लि. यांचेकडून कॉस्ट प्लस तत्वावर गौरीदीप, उदानी, भटाडी, उर्धन व न्यू मांजरी या खाण परिसरातून साधारण प्रतिदिन १ रेक कोळसा चंद्रपूर महाऔ.वि. केंद्राला प्राप्त होत होता.

या सर्व उपाययोजनांमुळे कोळसाटंचाईवर मात करण्यात यश आले आहे. सध्या देखील राज्यासाठी पुरेसे वीज उत्पादन करण्यात येत असून ते यापुढेही करण्यात येईल, जेणेकरुन विजेची कमतरता भासणार नाही.

## परळी औष्णिक विद्युत केंद्रात पक्षी मित्र सप्ताहानिमित्त माहितीपट संपन्न

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयान्वये दि. ०५ ते १२ नोव्हेंबर २०२१ या कालावधीत "पक्षी सप्ताह" साजरा करण्याबाबत महाराष्ट्र शासनाकडून आवाहन करण्यात आलेले होते. सदर पक्षी सप्ताह आणि डॉ. सलिम अली (Bird Man of India) यांची १२५वी जयंती यांचे औचित्य साधून परळी औष्णिक विद्युत केंद्र येथे मानव संसाधन विभागात उप व्यवस्थापक या पदावर कार्यरत असलेले श्री. भुषण पाठे यांनी "पक्षी" या विषयावर माहितीपट सादर करुन श्री. पाठे यांनी पक्ष्यांचे काढलेले विविध छायाचित्रे सुध्दा माहितीसहित सादर केली. श्री. भुषण पाठे हे महाराष्ट्र पक्षीमित्र चे आजीवन सभासद / बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे सभासद तसेच सर्पमित्र व वन्य जीव संरक्षण कार्यकर्ता आहेत.

उपस्थित सर्व अधिकारी, विभागप्रमुख, सहकारी कर्मचारी यांनी सदर विषयाची माहिती घेऊन चर्चा केली. सदर माहितीपटाला पर्यावरण संवर्धन हा वेगळा विषय मांडलेला असल्यामुळे सर्वांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या माहितीपटासाठी परळी औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हाड, उप मुख्य अभियंता श्री. हिंमतराव अवचार, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. नंदकिशोर चन्ने तसेच डॉ. जयंत वडतकर – अध्यक्ष, महाराष्ट्र पक्षीमित्र, अमरावती यांचे अमूल्य मार्गदर्शन लाभले. मुख्य अभियंता मा.श्री. आव्हाड यांनी स्तुत्य उपक्रम राबविल्याबद्दल मानव संसाधन विभागाचे अभिनंदन केले.

## परळी औष्णिक विद्युत केंद्राचा सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिन उत्साहात संपन्न

मराठवाड्याचे भूषण व महानिर्मिती परिवारात वीजनिर्मितीसाठी कायम अग्रेसर असलेले परळी औष्णिक विद्युत केंद्राने दि. १५ नोव्हेंबर २०२१ रोजी यशस्वीरित्या सुवर्ण महोत्सवी ५० वर्ष पूर्ण केले आहेत. मुख्य कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख अतिथी मा.श्री. चंद्रकांत थोटवे - संचालक (संचलन) आणि श्री. राजेश मोराळे - मुख्य अभियंता (भांडार) इ. मान्यवर मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परळी औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. एम.पी. आव्हाड तसेच उप मुख्य अभियंता श्री. एच.के. अवचार व अधीक्षक अभियंता श्री. एस.पी. राठोड, श्री. डी.जी. इंगळे, श्री. सी.आर. होळंबे, डॉ.सौ. ज्योती रांदड तसेच वर्धापन दिन समितीचे सचिव श्री. विष्णु घुले, सहसचिव श्री. मजहर पठाण, श्री. उध्दव फड व सौ. कल्पना मुंडे उपस्थित होते.

वर्धापन दिनानिमित्त दि. १५ नोव्हेंबर २०२१ रोजी सकाळी परळी औ.वि. केंद्राच्या मुख्य प्रवेशद्वाराचे पूजन मुख्य अभियंता मा.श्री. आव्हाड यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच ज्येष्ठ कर्मचारी श्री. डी.के. माने - प्रभारक श्रेणी-१ व वाहनचालक श्री. शिवाजी खामकर यांच्या उपस्थितीत सपत्नीक सत्यनारायण पूजेचा कार्यक्रम संपन्न झाला. तद्नंतर प्रवेशद्वाराजवळ अधिकारी, कर्मचारी व संघटनेच्या प्रतिनिधींच्या हस्ते नारळ फोडण्यात आले व प्रसादाचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रभारी उप मुख्य अभियंता श्री. एच.के. अवचार व उत्सव समितीचे सचिव श्री. विष्णु घुले यांनी वर्धापन दिनाच्या निमित्ताने विविध उपक्रम व कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दलची सविस्तर माहिती सांगितली. महानिर्मिती कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.श्री. संजय खंदारे, कार्यकारी संचालक मा.श्री. अभय हरणे, खापरखेडा औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. राजु घुगे यांचा शुभेच्छा संदेश चित्रफितीद्वारे दाखविण्यात आला. तसेच सर्व संचालक, कार्यकारी संचालक व इतर मान्यवरांनी वर्धापन दिनानिमित्त वीज केंद्रातील अधिकारी, अभियंते, कर्मचारी, कंत्राटदार व कंत्राटी कामगार यांच्याकरिता दिलेल्या शुभ संदेशाचे वाचन करण्यात आले. परळी वीज केंद्रास ५० वर्षे पूर्ण होत असल्याने आजपर्यंतच्या संपूर्ण वाटचालीचा व प्रगतीचा आढावा घेतलेली डॉक्युमेंट्री फिल्म दाखविण्यात आली. याप्रसंगी मुख्य अभियंता (कार्य) मा.श्री. मोराळे यांनी वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाबद्दल कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. संचालक (संचलन) मा.श्री. चंद्रकांत थोटवे यांनी सर्व अधिकारी, अभियंता, कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करुन भविष्यातही परळी औ.वि. केंद्राच्या प्रगतीचा चढता आलेख असाच कायम ठेवण्याचे आवाहन करुन मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना मुख्य अभियंता मा.श्री. आव्हाड यांनी सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिनानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या व परळी औ.वि. केंद्राच्या ५० वर्षांतील वाटचालीचे सिंहावलोकन करुन वर्धापन सोहळ्याच्या निमित्ताने अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या मनात कर्तव्य तत्परतेची भावना निश्चित वाढीस लागते, असे सांगितले.

यानंतर वर्धापन दिनानिमित्त आंतरगृह व बाह्यगृह क्रीडा स्पर्धा तसेच मॅरेथॉन स्पर्धा, आनंद मेळावा, महिलांसाठी रांगोळी व हस्तकला प्रदर्शन व इत्यादी स्पर्धा घेण्यात आल्या, या सर्व स्पर्धेच्या विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरीत करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन श्री. महेंद्र शिंदे व सोनाली डोंगरे यांनी केले. या कार्यक्रमास सर्व अधिकारी, अभियंते, कर्मचारी, सर्व संघटना पदाधिकारी, सर्व कंत्राटदार व कंत्राटी कामगार तसेच कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांनीही उत्स्फूर्तपणे मोठ्या संख्येने उपस्थित दर्शविल्याने ५०वा सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिन सोहळा अधिक रंगतदार वाटला. सर्व क्रीडास्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम व मुख्य समारंभाच्या यशस्वीतेसाठी वर्धापन दिन उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी आणि सदस्य यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमादरम्यान सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी कोव्हिड-१९ च्या नियमांचे पालन करुन योग्य ती दक्षता घेतली होती.

## महानिर्मिती कंपनीच्या मानव संसाधन विभागाकडून *CPF Schedule* ही संगणकीय प्रणाली अद्ययावत

महानिर्मिती मानव संसाधन विभागातर्फे 'गतिमान प्रशासन - मानव संसाधन' या संकल्पनेच्या अधीन राहून माहे नोंव्हेंबर २०२१ मध्ये विहित कालावधीत माहे ऑक्टोंबर २०२१ पर्यत CPF Schedule हे संगणकीय प्रणालीतील अद्ययावत करण्यात आले. सदरहू कामामुळे महानिर्मिती अधिकारी / कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधीशी संबधित कामे जसे परतावा अग्रीम, अंतिम भविष्य निर्वाह निधी रक्कम व सेवानिवृती वेतनाशी निगडीत कामे विनाविलंब मार्गी लावणे सोयीचे झाले आहे. सदरहू काम पुर्ण करण्यास महानिर्मिती कंपनी मुख्य कार्यालय तसेच सर्व विद्युत केंद्र कार्यालयातील मानव संसाधन विभागातील अधिकारी/कर्मचारी यांचे अनमोल सहकार्य मिळाले. या कामाकरिता भविष्य निर्वाह निधी विभागातील श्री. लक्ष्मीनारायण, प्रणाली विश्लेषक, महावितरण व सौ. प्रियंका उगले, उच्चस्तर लिपिक (वि. व ले.), महावितरण यांचे देखील विशेष सहकार्य लाभले. या प्रसंगी मा.श्री. भिमाशंकर य. मंता, कार्यकारी संचालक (मा.सं.), महानिर्मिती यांनी श्री. आनंद आबाराव कोंत, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) महानिर्मिती, श्री. रणधीरकुमार पाठक, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं. - देयके), महानिर्मिती, श्री. लक्ष्मीनारायण, प्रणाली विश्लेषक, महावितरण व सौ. प्रियंका उगले, उच्चस्तर लिपीक (वि. व ले.), महावितरण यांना पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा देऊन भविष्यातदेखील अजून चांगल्याप्रकारे काम करणेबाबत सूचना दिल्या.

सदरील बाब ही तीनही वीज कंपन्यांमध्ये सर्व प्रथम महानिर्मिती कंपनी मानव संसाधन विभागाने पूर्णत्वास नेलेली आहे.

# आयुष्य एक प्रवास - एका वाटेवरचा

**- संजय कुलकर्णी,**
कार्यकारी अभियंता (मध्यवर्ती खरेदी विभाग) गट-२,
मुख्यालय, मुंबई



वाटा आणि प्रवास एक अभिन्न नातं. किंबहुना आयुष्य हा एक प्रवास ही अन् वाट ही. आयुष्याच्या या वाटेवरून चालताना प्रत्येक जण अनुभवतो. ...हा प्रवास आयुष्याचा ...हा प्रवास वयाचा ...हा प्रवास सुख दु:खांचा ...हा प्रवास स्थानांचा. वाट ही एकच असते मात्र वळणा वळणावर प्रवासाचे टप्पे बदलतात आणि श्वास सुरु आहे तोपर्यंत हा प्रवास सुरूच राहतो.

जन्माला आल्यापासून ते शालेय जीवनापर्यंतचा हा प्रवासाचा पहिला टप्पा. मायेच्या पदराखाली घडलेला उबदार प्रवास ...जणू रेल्वेच्या AC बोगीतल्या प्रवासासारखा. मात्र हा उबदारपणा प्रत्येकाच्या वाट्याला येतोच असे नाही .

शालेय जीवन संपले कि तारूण्याच्या उंबरठ्यावर एक वळण येते आणि सुरु होतो कॉलेज लाईफ चा अनोखा व अविस्मरणीय प्रवास. कोणाच्या तरी एका स्मित हास्याने, चोरट्या कटाक्षाने आतापर्यंतचा AC बोगीतला हा प्रवास विमान प्रवासात कधी परावर्तित होतो हे कळतच नाही. ह्या प्रवासात आपण नकळत देहभान विसरून स्वप्नांच्या दुनियेत उंच उंच भरारी घेत असतो एखाद्या रम्य सहवासात . मात्र हा हवाहवासा वाटणारा स्वप्नवत कॉलेज प्रवास चटकन संपतो, करणार काय, शेवटी विमान प्रवासच तो.

पुन्हा एक वळण येते आणि प्रवासाचा पुढचा टप्पा सुरु होतो . आतापर्यंतच्या प्रवासात पोटातले पाणीही हललेले नसते मात्र या टप्प्याच्या सुरुवातीलाच मोठे झटके बसायला सुरुवात होते. कॉलेजच्या मोरपंखी आयुष्यातील गोड आठवणींच्या धुंदीत सुरु असलेल्या हळुवार प्रवासात हरवलेले आपण खाडकन जागे होतो अन पाहतो तर काय ...पुढचा मार्ग अत्यंत बिकट असतो, खाचखळग्यांनी काट्याकुट्यांनी भरलेला. अनेक आव्हाने आपली वाट पाहात असतात. वडिलांची सेवानिवृत्ती, लहान भावंडांची शिक्षणं, बहिणीचे लग्न, आजारपण आणि बेरोजगारी. आणि सुरु होतो खरा संघर्ष, या रस्त्यावर कधी कधी उपासही घडतो तर कधी वडापाव भूक भागवतो. कॉलेज लाईफ मधील विमानप्रवासात भेटलेली मैत्रीण नकळत दुरावते, तिची वाट वेगळी होते अन् प्रवासही. या प्रवासात मात्र पुढे पुढे जावेच लागते, एकटेच. या प्रवासात आपण थकतो, वैतागतो. आयुष्याच्या रणरणत्या उन्हातील चटके आपणांस जेरीस आणतात, मात्र या खडतर प्रवासाच्या गर्भातच उद्याचा उष:काळ दडलेला असतो हे मात्र तितकेच खरे.

**वो सिकंदर ही दोस्तो कहलाता है ,**
**हारी बाजी को जितना जिसे आता है ,**
**निकलेंगे मैदान मी हम जिस दिन झुमके ,**
**धरती बोलेगी उस दिन कदम चुम के...**

येस. ...ह्या दुर्दम्य आत्मविश्वासासोबत न डगमगता पुढे गेलो तर हा खडतर प्रवास एका वळणावर निश्चितपणे सुखद होतो ....आयुष्याचे सत्य आपण स्वीकारलेले असते, तडजोडीची तयारी केलेली असते. ...या दूर जाणाऱ्या वाटेवर नकळत कानावर सूर पडतात,

**ही वाट दूर जाते, स्वप्नामधील गावा,**
**माझ्या मनातला असेल का तेथे रावा**

एक हमसफर एका थांब्यावर भेटतो/भेटते, कायमची सोबत देण्यासाठी ....स्वप्नांचे धुके विरलेले असते समोर स्वच्छ सूर्यप्रकाश आणि लांबवर जाणारी वाट ...वाट तीच खडतर मात्र आपण आता सरावलेलो असतो त्या अडथळ्यांना आणि सोबत आता कोणीतरी असते सावरणारे .

परत नवीन नवलाईचा, आशेचा, आकांक्षांचा, स्वप्नांचा प्रवास सुरु होतो या प्रवासात कोणी परी नसते आणि नसतो कोणी angel, हो मात्र असतो एक राजा अन् एक राणी.

आणि नकळत या प्रवासात आपली गाडी वेग घेते, कधी ती सुकाणू सांभाळते तर कधी तो प्रवासाला दिशा देतो तिच्या भक्कम आधारावर , प्रवासाच्या या टप्प्यात एक छोटेसे घरटे विणले जाते, आयुष्यातील अंतिम पडाव, विश्रांतीसाठी ....मात्र प्रवास थांबत नाही ...हा प्रवास मात्र स्वप्नातला नसतो तर असतो वास्तवातला. पुढे प्रवासात काही चिमण्या प्रवाश्यांचे आगमन होते आणि जबाबदाऱ्या वाढतात. मात्र दोघेही एकमेकांच्या आधारावर, विश्वासावर आनंदाने मार्गक्रमण करत असतात. एकमेकांच्या सहवासात, चिमणपाखरांच्या किलबिलाटात या वाटेवरील काटे ही सुखद वाटत असतात,

म्हणतात ना,

**वाटेवर काटे वेचित चाललो,**
**वाटले जसा फुलाफुलात चाललो**

प्रवासात पुढे एका वळणावर जाणवते की, आता प्रवासाची गती मंदावली आहे. चिमणी पाखरे मोठी झाली असून त्यांच्या पंखात बळ आले आहे. त्यांचा उबदार AC बोगीतला प्रवास आता पूर्ण झालेला असतो आणि एका वळणावर ती नव्या जोमाने उड्डाण करून त्यांच्या स्वतंत्र प्रवासाला सुरुवात करतात. सोबत नेतात आपल्या आशिर्वादाची शिदोरी, सोडून जातात न संपणाऱ्या आठवणी.

मग उरतात फक्त ती दोघे ..आणि सोबत संथ, शांत प्रवास . कसली घाई नाही , कुठले टार्गेट नाही ..वाट तीच मात्र आता पूर्वीची वर्दळ नाही. ...तरीही प्रवास सुरूच असतो ...प्रत्येक श्वासासोबत...

दुर्दैवाने सहचराने साथ सोडला तरी प्रवास थांबत नाही, मात्र आपण सुकाणू सोडून देतो आणि वाट नेईल तिथे भरकटत जातो .... एकट्याचा प्रवास सुरूच असतो श्वासासोबत ...कारण श्वास सुरु असतो ..म्हणतात ना ..

**तुझ्यापासून दूर गेल्यावरही तुझी आठवण**
**प्रत्येक पावलावर जाणवते आहे ,**
**तू सोबत नसताना प्रत्येक क्षणांची चाहूल**
**मला त्याच वाटेवर बोलावते आहे..**

आयुष्य एक प्रवास... एका वाटेवरचा... न संपणारा...

******

## महानिर्मिती आणि टाटा पॉवरची उपकंपनी टी.पी.एस.एल. सोबत दोंडाईचा सोलर पार्क उभारणेबाबत करार संपन्न

महानिर्मितीकडून उभारल्या जाणाऱ्या दोंडाईचा सोलर पार्कमध्ये टाटा पॉवर तब्बल २५० मेगावॅटचा सौर प्रकल्प उभारणार आहे. त्याबाबत महानिर्मिती आणि टाटा पॉवरची उप कंपनी टी.पी.एस.एल. मध्ये करार झाला आहे. त्यानुसार पुढील पंधरा महिन्यांत हा प्रकल्प उभारला जाणार असून प्रत्यक्ष वीजनिर्मिती सुरु होणार असून सदर वीज महावितरणला पुरविण्यात येणार आहे.

सौर आणि पवन ऊर्जा प्रकल्पाच्या उभारणीला केंद्रीय अपारंपारिक ऊर्जा विभागाकडून प्रोत्साहन मिळाले. त्या पार्श्वभूमीवर महानिर्मिती धुळे जिल्ह्यात भव्य सोलर पार्क उभारत आहे. त्यामध्ये टाटा पॉवर अडीचशे मेगावॅटचा फोटोव्होल्टाईक तंत्रज्ञानावर आधारित सौर प्रकल्प उभारणार असून त्याबाबतचे राज्य वीज नियामक आयोगाने दर मंजुरीच्या अधीन राहून देकार पत्र महानिर्मितीने टी.पी.एस.एल. ला दिले आहे. त्यामुळे टाटा पॉवरच्या अपारंपारिक निर्मिती प्रकल्पांची एकूण क्षमता ४६११ मेगावॅटवर पोहोचणार असल्याचे टाटा पॉवरने स्पष्ट केले. हा सौर प्रकल्प ग्रीड कनेक्टेड असल्यामुळे तिथे तयार होणारी वीज राज्यभरात पुरवता येणारे आहे. दरम्यान या प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणात कार्बनचे उत्सर्जन कमी होणार आहे.

## महानिर्मिती राज्यात विविध ठिकाणी सौर ऊर्जा प्रकल्प उभारणार

महानिर्मिती कंपनीतर्फे राज्यातील विविध जागांवर एकूण ५७७ मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. सदर सौर प्रकल्प महानिर्मितीतर्फे इंजिनिअरिंग – प्रोक्युरमेंट – अँड कन्स्ट्रक्शन (EPC) तत्वावर उभारण्यात येणार आहेत. याकरिता महानिर्मिती भागभांडवल उभे करणार असून उर्वरित रक्कम मे. के.एफ.डब्ल्यु. बँक, जर्मनी यांच्याकडून अल्प दरामध्ये कर्ज घेणार असल्याने महाराष्ट्र शासनाच्या तिजोरीवर याचा कोणताही अतिरिक्त भार येणार नाही.

या सौर क्षमता वाढीअंतर्गत मौजे कौडगाव, जिल्हा उस्मानाबाद येथे ५० मेगावॅट क्षमतेचा, मौजे सिंदाला (लोहारा), जिल्हा लातूर येथे ६० मेगावॅट क्षमतेचा तसेच औष्णिक विद्युत केंद्रामधील वापरात नसलेल्या जागेवर भुसावळ येथे २० मेगावॅट, परळी येथे १२ मेगावॅट, कोराडी येथे १२ मेगावॅट, व नाशिक ८ मेगावॅट असे एकूण ५२ मेगावॅट क्षमतेचे आणि मौजे शिवाजीनगर, साक्री जिल्हा धुळे येथे २५ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प असे एकूण १८७ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. यासाठी एकूण ७४६ कोटी रुपये खर्च होणार असून यापैकी १५८ कोटीचे भागभांडवल महानिर्मितीतर्फे उभारण्यात येणार असून उर्वरित ५८८ कोटी रुपये, मेसर्स. के.एफ.डब्ल्यु. बँक, जर्मनी यांचेतर्फे सन २०११ मधील मंजूर अर्थसहाय्य करारामधील शिल्लक कर्ज रकमेतून अल्पदरामध्ये प्राप्त होणार आहे.

तसेच ३९० मेगावॅट सौर प्रकल्पापैकी वाशिम–१ अंतर्गत जिल्ह्यातील मौजे दुधखेडा, मौजे परडी टाकमोर, तसेच मौजे कंझारा येथे एकूण १३० मेगावॅट क्षमतेचे तसेच वाशिम–२ प्रकल्पांतर्गत मौजे बाभूळगांव व मौजे सायखेडा येथे प्रत्येकी २० मेगावॅट असे एकूण ४० मेगावॅट क्षमतेचे तसेच चंद्रपूर जिल्ह्यात मौजे कचराळा येथे १४५ मेगावॅट क्षमतेचा तर यवतमाळ जिल्ह्यात मौजे मंगलादेवी, मौजे पिंपरी इजारा व मौजे मालखेड येथे प्रत्येकी २५ मेगावॅट असे एकूण ७५ मेगावॅट क्षमतेचे असे एकंदरीत ३९० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. याकरिता एकूण १५६४ कोटी रुपये खर्च अपेक्षित असून यापैकी १२०० कोटी रुपये ०.०५ टक्के प्रतिवर्ष या दराने के.एफ.डब्ल्यु. बँक, जर्मनी यांच्याकडून कर्ज घेण्यात असून महानिर्मिती ३६४ कोटी रुपये भागभांडवल उभे करणार आहे.

या सौर प्रकल्पांमुळे महाराष्ट्र शासनाच्या हरित ऊर्जा निर्मितीमध्ये भर पडणार असून याचा फायदा महाराष्ट्रातील ग्राहकांना होणार आहे.

# *An overview of Condensate Polishing Unit*

***- Vivek P. Ghodmare***
Superintending Chemist,
H.O., Mumbai.



***Introduction :*** As name suggests, CPU (Condensate Polishing Unit) is basically a polishing unit, which polishes water for desired parameters. Condensate polishing helps extensively to remove dissolved chemical impurities in the water-steam cycle and keeps the system clean. Generally, two out of three CPU's are required to be kept in service for better efficiency.

***Requirement :*** During extensive circulation of liquid media in the form of water and steam in the water-steam cycle, many impurities gets added into the system. These impurities increases total dissolved chemical ionic load in the system. For high-pressure boilers, where limit of allowed chemical parameters is very narrow (in ppb), addition of even miniscule ions enhances total impurities to alarming level. Although de-mineralised water is free from all dissolved impurities, it is always beneficial to have additional system like CPU for removal of impurities.

***Principle :*** CPU operates on the principle of ion exchange reaction. The vessel of CPU contain mix bed of cation and anion resins. While, cation resins (positively charged) traps positive impurity ions (like $Na^+$, $Ca^{2+}$, $Mg^{2+}$ etc), anion resins (negatively charged) traps negative impurity ions (like $SO^{4-}$, $Cl^-$, Silica etc). Once the capacity of both cation and anion resins to trap further impurities start diminishing, resin is said to have exhausted. To use it once again, it requires chemical treatment called regeneration. Cation resin is regenerated by Hydrochloric acid whereas anion resin is regenerated by Caustic Soda lye.

***Methodology :*** In Mahagenco, units of 660 MW, 500 MW & some 250 MW are provided with CPU.

From the experience gained at 660 MW unit of Koradi TPS, and as a best practice, it is always advisable to take CPU in service immediately after CEP is started during light up. In initial phase of light up, the amount of crud, mud and chemical impurities (which are settled due to shut down of unit) are more. Hence, if these impurities are arrested in early phase, then it helps to keep the entire system clean and further silica clearance for raising pressure can be given quickly.

Polishing of CPU, also reduces boiler tube leakages generally attributed to chemistry reasons like corrosion, scaling or deposition etc.

Some experts prefer to take CPU in service at later stage of light up to avoid CPU being exhausted early. However, technical and financial benefits of quicker silica removal are more than the benefits of saving CPU for later stage of light up. Some also fears that deaerator level may go down if CPU is taken in service early. However, it should be kept in mind that during light up only 10-20% system water is passed through CPU and therefore maintaining deaerator level may not be that difficult.

Taking CPU earlier not only saves precious water in blow down (given for silica removal) but also saves heat energy of the water (anticipating same blow down is given at later stage at elevated temperature and water required for washing CPU resin while taking in service).

***Benefits :*** Since ionic impurities are removed due to CPU, ionic load in the circulating water is minimized. Thus, carry-over of the impurities to the drum and turbine is avoided and the chemical parameters can be maintained in required range. This also helps to avoid corrosion or scaling/deposit in the boiler piping as well as drum internals and turbine.

CPU not only act as polisher but it also works like filter to remove crud and non-dissolved impurities in water.

Needless to say that, taking CPU earlier in service during light up and keeping all the CPU's in service at all times is the key to avoid boiler chemistry related issues of high pressure thermal power plants.

******

# दुबई एक्स्पो... एक अविस्मरणीय अनुभव

– अभय हरणे
प्रभारी कार्यकारी संचालक (सं. व सु. – १),
मुख्यालय, मुंबई.




Connecting Minds, Creating The Future...

कार्यालयात एका मिटींगमध्ये असताना एक सुखद बातमी अचानक आली, 'साहेब, तुम्हांला दुबई एक्स्पोसाठी पुढील आठवड्यात जायचे आहे. सोबत श्री. नितीन वाघ – कार्यकारी संचालक (पर्यावरण व सुरक्षा) आणि श्री. राजेश मोराळे – मुख्य अभियंता (कार्य) हे सुध्दा येणार', हे ऐकून आनंद द्विगुणित झाला.

आमच्यावर विश्वास ठेवून या कार्याकरिता आमच्या नांवाची शिफारस व शिक्कामोर्तब केल्याबद्दल सर्वप्रथम मी महानिर्मितीचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक व सर्व संचालक मंडळाचे शतश: आभार मानतो.

सध्याच्या ग्लोबलायझेशनच्या युगात जगातील सर्व राष्ट्रांना नवीन तंत्रज्ञानाची देवाणघेवाण व त्यापुढेही जाऊन व्यवसायाच्या अनेक संधी उपलब्ध करुन देण्यासाठी 'दुबई एक्स्पो २०२०' हे अतिशय उत्कृष्ट असे जागतिक व्यासपीठ असून जगभरातील १९२ राष्ट्रांचा यात प्रत्यक्ष समावेश होता. ऑक्टोबर २०२१ पासून सहा महिन्यांकरिता हे प्रदर्शन सुरु राहणार असून यात जगभरातील शेकडो कंपन्या व लाखो व्यवसायिक प्रत्यक्ष भेट देणार आहेत. यात प्रत्येक राष्ट्र आपल्याकडील Vibrant Culture व विकासाच्या संधीवर आपापल्या पॅव्हेलियनमध्ये सादरीकरण, दृकश्राव्य माध्यम व प्रत्यक्ष भेटीद्वारे आपला संदेश सर्वांपर्यंत पोहोचवणार आहेत.

दुग्धशर्करा योग म्हणजे भारत या वर्षी स्वातंत्र्यपूर्तीला ७५ वर्ष पूर्ण होत असल्याने 'आजादी का अमृत महोत्सव' साजरा करीत आहे, तर संयुक्त अरब अमिराती देखील आपल्या स्थापनेस ५० वर्ष पूर्ण करीत आहे.

दि. २८ नोव्हेंबर २०२१ रोजी रात्री आम्ही मुंबई विमानतळावर सर्व पूर्वतयारी (अर्थात तिकीट / व्हिसा / आर.टी.पी.सी.आर. टेस्ट रिपोर्ट / दुबई एक्स्पो २०२० चे आमंत्रण इ.) करुन पोहोचलो.

महाराष्ट्रातील ऊर्जा क्षेत्रात खात्रीशीर व कमी दरात ग्राहकांना वीज उपलब्ध करुन देण्याकरिता नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन कार्यक्षमतेत वाढ कशी होईल तसेच ग्लोबल वॉर्मिंगच्या काळात पर्यावरणाची हानी कशी कमी होईल याकरिता जगातील उत्कृष्ट तंत्रज्ञानाची देवाणघेवाण करण्याच्या दृष्टीने हा दौरा आयोजित केला होता.

या दौऱ्यातील वैशिष्ट्यपूर्ण ठळक बाबी खालीलप्रमाणे :-

- दुबई एक्स्पो २०२० दरम्यान राज्याच्या सहभागामध्ये ऊर्जा विभागाचे प्रतिनिधीत्व.
- ऊर्जेसंबंधी राज्याचे 'व्हिजन' आणि 'मिशन' अधोरेखित करणे.
- जागतिक संभाव्य सहकाऱ्यांचा शोध घेणे.
- प्रकल्प संधी निर्माण करणे.
- उद्योग नेटवर्किंग आणि प्रतिबध्दता.
- आंतरराष्ट्रीय कंपन्यांना महाराष्ट्रात आमंत्रित करणे व महानिर्मिती फोकस क्षेत्रे.
- पर्यावरणपूरक उपायांसह फ्लाय ॲश व्यवस्थापन आणि वापराशी संबंधित क्षेत्रे.
- सिनोस्फिअर तवंगाचे निष्कर्षण तंत्रज्ञान.
- कमी किंमतीच्या तंत्रज्ञानासह उष्णता दर कमी करणे आणि कार्यक्षमतेत सुधारणा.

Circular Economy Alliance Australia (CEAA) या ऑस्ट्रेलियन सरकारच्या कंपनीमार्फत खालील मुद्यांवर सुध्दा पुढील काळात महानिर्मितीसोबत तंत्रज्ञान देवाणघेवाण करण्यात येईल.

- फ्लाय ॲशचा वापर आणि व्यवस्थापन
- जिओ-पॉलिमरवरील विद्यापीठांच्या गटासह संशोधन आणि विकास
- साहित्य पुनर्प्राप्ती तंत्रज्ञान

अपारंपारिक ऊर्जेच्या भविष्यातील होणाऱ्या वीजनिर्मितीत लक्षणीय वाढ पुढील काही वर्षात होणार असून त्याकरिता औष्णिक विद्युत केंद्राचे लवचिक संचलन (Flexible Operation) याची प्रकर्षाने अंमलबजावणी करणे ही काळाची गरज आहे. औष्णिक विद्युत संच जास्तीत जास्त सुस्थितीत चालविण्याचे आव्हान या पुढील काळात समोर असणार आहे. याकरिता तंत्रज्ञानाच्या देवाणघेवाणीसाठी M/s. STEAG या जर्मन कंपनीचे सुध्दा सहकार्य पुढील काळात घेण्यात येणार आहे.

- किमान लोड आणि स्टार्टअप खर्च ऑप्टिमायझेशन.
- आर्थिक तंत्रज्ञानासह वाढ करणे.
- हार्डवेअरमध्ये किमान बदल.
- उपकरणाच्या शेल्फ लाईफचा विस्तार.
- वितरण तोटा कमी करण्यासाठी तंत्रज्ञानातील संधीचा शोध.
- प्रायोगिक प्रकल्पासाठी विद्यमान वीज प्रकल्पांचा अभ्यास आणि पुनरावलोकन.

महानिर्मितीच्या वतीने या जागतिक प्रदर्शनीच्या भव्य स्वरुपाचे आम्ही साक्षीदार होतो. महानिर्मितीच्या प्रगतीपथावर न्यायचे असेल तर या वीजक्षेत्रात वैश्विक पातळीवर जे जे काही म्हणून अद्ययावत तंत्रज्ञान उपलब्ध आहे, त्याचा शोध घेऊन त्याचा सखोल अभ्यास करुन संबंधित जागतिक सहकाऱ्यांशी सामंजस्य कराराच्या माध्यमातून सहयोग साधणे आवश्यक आहे. पर्यावरण संवर्धन हा विषय काही आता एका राष्ट्रापुरता उरला नसून तो जागतिक महत्वाचा विषय बनलेला आहे. वीजनिर्मिती क्षेत्रात पर्यावरण संवर्धनाचे अनुषंगाने होणारे नवनवीन क्रांतिकारी तंत्रज्ञानविषयक बदल आत्मसात करुनच आपण महानिर्मितीची सेवा अधिक चांगल्या प्रकारे करु शकतो याचा प्रत्यय या 'दुबई प्रदर्शनी' दौऱ्याच्या निमित्ताने मला निश्चितच आला.

******

# *Induction of Advanced Fire Fighting Vehicles (Fire Tenders) at MahaGenco's Power Plants*

***- Shashikant Papade***
Fire Advisor & Chief Fire Officer
Head Office, Mumbai.



In the era of fast development in the Industrial Sector, Power Industries has not been left aside. A continuous supply of electric power is of primary importance to almost all human activities, particularly for Industries. In recent years, global power requirements are continuously increasing. Thus; in order to meet the demand, the energy sector is currently embarking on construction of new advanced but more complex structured Power Plants. To keep the pace with revolutionised Power Sector, MahaGenco is also progressing aggressively with such modern Power Generating Units, of course, with inherent fire hazards and subsequent threat at its Boiler, Turbines, Generator, Transformers, Coal Handling Plant, Ash Handling Plant, etc. which is further complicated by coexistence of hazardous and explosive nature of material like Hydrogen, Chlorine and various other chemicals in addition to huge stock of fuel like Coal, Oil in the close proximity of each other and that too in the web of extremely hot steam-pipes and energised conductors.

In 1980s; Fire Tenders used to be equipped with only basic Fire Pump and Water Tank of smaller capacity along with some miscellaneous equipment. In late 1990s; MahaGenco Fire Services had introduced Multipurpose Fire Tenders, which carries different extinguishing media viz. Water, Mechanical Foam and Dry Chemical Powder but with limited Pump capacity and conventional equipment.

However; in the era of highly revolutionised and more complex Power generation process, Fire Services has to confront greater fire-hazard and associated risk. Thus it felt necessary to induct Fire Tender, laced with technologically advanced equipment to deal with the challenges arising out of the changing complexity of the Power generating Units. Fire Services had decided to strengthen its capabilities by way of modernisation of the fire brigades for self-reliant by replacing aged conventional Fire Tenders. The management has not left any stone unturned to ensure fire safety of the Units to enhance efficacies of the Fire Services.

Efforts of almost 8-9 months were put in for the customisation and designing these sophisticated, technologically advanced Fire Tenders with state-of-the-art modern equipment of international level, laced with unique features, as appended below.

Thus; after years of plodding with old and obsolete equipment, the Fire Services now boasts some of the latest and most advanced Fire Fighting Vehicles in its fleet. These Fire Tenders has been added to an existing convoy which will bolster the fire-fighting capabilities of MahaGenco's Fire Brigade.

a) ***Remote-controlled Long-Range Water-cum-Foam Monitors:*** It has three times discharge capacity as compared to the existing Water Monitors on other old Fire Tenders and therefore facilitate much longer reach. Because of its remote-controlled feature, firefighters can operate it from a safe distance, while dealing fires of explosive nature like Transformer, Oil-tanks, etc. Due to such unique feature, firefighters do not require to go up on the Turret of the vehicle to operate the Monitor and thus ensure personnel safety.

b) ***Water Mist:*** Mist is the latest fire-suppression technology, currently being adopted worldwide, which can increase the effective firefighting duration up to almost 30 times more compared to a conventional pumping system. It

can also be used on energized equipment with appropriate technique.

c) ***Use of multiple Extinguishing Media:*** These Fire Tenders facilitate to use variety types of extinguishing media viz. water in the form of Jet, Spray, Curtain, Mist, Mechanical-foam, Dry Chemical Powder (DCP), $CO_2$ Gas, etc. all from One Fire Tender and therefore offers all-round performance.

d) ***Wear & walk away type Breathing Apparatus (BA Sets):*** This feature enables the fire fighter to keep their BA sets ready at all times in the seat itself and thereby facilitates quick-donning for fast action before disembarking from the vehicle while responding the emergency.

e) ***Light Mask:*** An effective fire Tender is one which can operate under any conditions. Poor visibility during night operations is one of the primary concerns of the fire departments all over the world. Once there is a fire, the immediate first reaction is to cut power supply of the affected area for the obvious safety reason. The pneumatically extending LED based flood lighting systems operate on the vehicle battery and pneumatic line is very much suitable for fire & emergency operations during night hours.

f) ***Ladder Gantry System:*** It is considered the safest alternative to remove the ladder manually from the vehicle roof top. This system enables the ladder to be retrieved from the vehicle roof top without climbing on the Turret of the vehicle, which ensure personnel safety. Moreover; it reduces crucial time required for ascending and its operations with less manpower.

g) ***Fire Pumps with higher capacity:*** 6000 LPM capacity Fire Pump has been considered to achieve longer range for fighting fires at specific height and distance.

h) ***Chassis:*** High Power Chassis has been selected for compatibleness with the power requirement of the Fire Pump/Monitor. In addition, it facilitates ease of handling the vehicle in any terrain, normally emergency vehicle has to face. For e.g., wetland at the Fire ground, Hilly terrain of Hydro, etc.

i) ***Automatic Priming:*** It facilitate immediate drawing of the water from open sub-surface water, if required, without priming the Pump.

j) ***LED lighting profiles on Shutters for lockers:*** It offers illuminated working environment during night time operation for the firemen to work at the lockers for want of equipment.

k) ***Fully electronic Control Panel:*** The Fire Pump and control valves is fitted with Electro-Pneumatic valves controlled by soft touch switches with the help of a central ***J1939*** CANBUS System with manual override facility which ensure fast action. LCD/TFT display at the panel shows real time operations and Water/Foam Level.

l) ***LED Water/Foam Level indicators:*** It is useful during night time operations when the tube level indicators are not visible. Moreover; conventional tube type level indicators deteriorate over time and thus pose difficulty to accurately gauge the water/foam levels after the tube becomes discolored.

m) ***Electrically operated Hose-reels:*** After any major fire; firefighters get fatigued after tiresome firefighting activities. Electrically operated hose-reels facilitate winding-up of hose-reel hose easily as manually it is very cumbersome due to compact space.

n) ***Use of non-corrosive material for Water/Foam:*** Fire Brigades end up using bad quality water as it requires to take water from any strange source at the time of firefighting. Moreover; firefighting Foam concentrate is sometimes a corrosive liquid and leads to premature corrosion of mild steel Water/Foam Tank, pipelines & valves and subsequent leakage is a regular Fire Service problem, which directly affects availability of such emergency vehicle. Hence non-corrosive (SS) material has been considered for Water/Foam Tank, pipelines & valves.

******

# आजादी का अमृत महोत्सव निमित्त महानिर्मिती कंपनीतर्फे विविध स्पर्धांचे आयोजन

दि. १५ ऑगस्ट २०२१ ते दि. १५ ऑगस्ट २०२२ हा कालावधी **"आजादी का अमृत महोत्सव"** म्हणून साजरा होत असल्याने महत्वाच्या योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्याकरिता विविध उपक्रम/आखणी करणे संदर्भात केंद्र शासन व राज्य शासन यांनी निर्देश दिलेले आहेत. यांस अनुसरुन **महानिर्मितीच्या जनसंपर्क विभागातर्फे पुढाकार घेऊन विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे.** या माध्यमातून तसेच विविध स्पर्धामधील व्यापक जनसहभागाच्या माध्यमातून महानिर्मितीची सर्वकष कामगिरी जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी तसेच महानिर्मितीच्या प्रतिमा संवर्धनास उपयुक्त ठरु शकणारा हा उपक्रम आहे.

**अ) (महानिर्मिती अंतर्गत कर्मचारी यांचेकरिता) :** या उपक्रमांतर्गत १५ ऑगस्ट २०२२ पर्यत टप्प्याटप्प्याने खालीलप्रमाणे विविध स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत. याबाबत सविस्तर परिपत्रक लवकरच सर्व कार्यालय यांना पाठविण्यात येईल.

**१) महानिर्मिती कर्मचारी यांचेसाठी निबंध स्पर्धा : (विषय - महानिर्मिती :- काल आज व उद्या)**

ही निबंध स्पर्धा महानिर्मितीमधील कर्मचारी यांचेकरिता असून यामध्ये महानिर्मितीच्या गतकालाचा आढावा घेत असताना भविष्यातील महानिर्मिती पुढील आव्हाने यावर जास्त भर असणे अपेक्षित आहे.

**बक्षिसे :** प्रथम (रु. २५,०००/-), द्वितीय (रु. १५,०००/-), तृतीय (रु. १०,०००)

**स्पर्धेसाठी अटी व नियम :**

(१) निबंध हे स्व-हस्ताक्षरात व पानाच्या एकाच बाजूला लिहिलेला अथवा टंकलिखित केलेला असावा. निबंधाकरिता इंग्रजी/मराठी अथवा हिंदी भाषेचा वापर चालेल.

(२) पहिल्या स्वतंत्र पानावरती स्पर्धकाचे नाव,संपूर्ण पत्ता पिनकोड सह ई-मेल आयडी, मोबाईल क्रमांक तसेच कार्यालयाचे नाव व विभाग यांचा उल्लेख करावा. या पानावर निबंध सुरु करु नये. वरील तपशीलाचे पान स्वतंत्र नसल्यास निबंध स्पर्धेतून बाद ठरवला जाईल. नि:पक्षपाती परिक्षणासाठी सदर नियम करण्यात आलेला आहे.

(३) निबंधाकरिता शब्दमर्यादा २००० असुन शब्दमर्यादेचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.

(४) निबंध हा प्रत्यक्ष अथवा स्पीड पोस्टने किंवा रजिस्टर पोस्टने पोचपावतीसह क्षेत्रीय कार्यालयामार्फत **दि. १५ फेब्रुवारी २०२२** पर्यंत नमूद केलेल्या पत्त्यावर पाठवावा. तसेच खाली नमूद केलेल्या ई-मेल आय.डी.वरच पी.डी.एफ. स्वरुपात पाठवू शकता.

(५) स्पर्धेचे परीक्षण गठित समितीद्वारे करण्यात येईल व अंतिम निकाल सर्वांना बंधनकारक असेल. विजेत्या स्पर्धकांच्या निबंधांना सृजन गृहपत्रिकेतून प्रसिध्दी दिली जाईल.

**निबंध पाठविण्याचा पत्ता :-**
**जनसंपर्क अधिकारी (सांघिक नियोजन व सुसंवाद),**
**महानिर्मिती,**
प्रकाशगड, २रा मजला, प्लॉट क्र. जी-९,
प्रोफेसर अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व),मुंबई -४०००६६.
दूरध्वनी क्र. : ०२२ - २६४७४२११ विस्तारित : ३६४२.
ई-मेल आय. डी. :- ***akamrut@mahagenco.in***

**२)** गेली सुमारे दोन वर्षे कोविड-१९ मुळे महानिर्मिती अंतर्गत नाटयस्पर्धा घेता आलेल्या नाहीत या पार्श्वभूमीवरती महानिर्मितीमधील नाट्यसंघ तसेच कलाकार यांना नव्याने प्रोत्साहन देणे तसेच त्यांच्यातील कलागुणांना व्यक्त होण्याची संधी मिळावी या हेतूने खालील स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे.

**महानिर्मिती क्षेत्रीय कार्यालयांमधील नाटयसंघासाठी नाटयछटा / पथनाटय स्पर्धा:- (विषय - वीजनिर्मिती / पर्यावरण संवर्धन / अपारंपारिक उर्जाक्षेत्राची वाटचाल / कोरोना उपाययोजना)**

**सांघिक बक्षिसे :-** प्रथम (रु. ७५,०००/-), द्वितीय (रु. ५०,०००/-),
तृतीय (रु. २५,०००)

**स्पर्धेसाठी अटी व नियम :-**

(१) नाटयछटा / पथनाटय याची लांबी १० मिनिटेपेक्षा जास्त कालावधीची नसावी.

(२) नाटयछटा / पथनाटय संघामध्ये कमीत कमी ४ तर जास्तीत जास्त १० सहभागी स्पर्धक असावेत.

(३) नाटयछटा / पथनाटय बनवताना त्यामध्ये आक्षेपार्ह बाबींचा समावेश नसावा तसेच धार्मिक भावना, जातीजमातीवर टिकाटिप्पणीचा समावेश नसावा किंवा गोपनीयतेचे उल्लंघन नसावे किंवा अवैध, अनैतिक तसेच सार्वजनिक हिताच्या विरुध्द कोणतेही घटक समाविष्ट नसावेत. असे आढळल्यास संबंधितांचा स्पर्धेतील सहभाग रद्द करण्यात येईल.

(४) कोविड-१९ च्या शासकीय नियमांचे पालन करुन प्रत्यक्ष सादरीकरण माध्यमातून स्पर्धा मुंबई प्रकाशगड येथील ॲम्फी थिएटरमध्ये सोयीस्कर दिवशी घेण्यात येईल, परंतु तत्कालीन परिस्थितीत या पध्दतीने स्पर्धा घेता येणे शक्य नसेल तर पर्यायी व्यवस्था म्हणून सहभागी संघांनी आपल्या रंगीत तालमीचे दर्जेदार व्हिडिओ शुटिंग करुन ठेवावे, जेणेकरुन त्याद्वारे व्हिडिओ क्लिपद्वारे परीक्षकांना परीक्षण करणे शक्य होईल. सदर व्हिडिओ क्लिप तयार करण्याचा खर्च स्पर्धक संघाने करावयाचा आहे. **सदर स्पर्धा शक्यतो मार्च २०२२ च्या पहिल्या पंधरवडयामध्ये घेतली जाईल.**

वरील स्पर्धा नियमांत आवश्यकतेनुसार बदल करण्याचा अधिकार आयोजक राखून आहेत. तथापि, असे बदल झाल्यास सर्व संबंधितांना ते वेळेत कळविण्यात येतील.

**संपर्क :**
**१) श्री. महेश आफळे** - जनसंपर्क अधिकारी, (भ्रमणध्वनी क्र. ९८३३६६६१८०)
**२) श्री. संतोष पुरोहित** - सहाय्यक जनसंपर्क अधिकारी (भ्रमणध्वनी क्र. ९०११२२०१९३)

**ब) अंतर्गत खुल्या राज्यस्तरीय स्पर्धा :-** या उपक्रमांतर्गत टप्प्याटप्प्याने खालीलप्रमाणे विविध स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत.

**१) अभियांत्रिकी पदविका / पदवी विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय संशोधनात्मक निबंध स्पर्धा :- (विषय - वीज क्षेत्रातील अभियांत्रिकी स्थित्यंतरे / नवीन व नवीकरणीय अपारंपारिक ऊर्जा क्षेत्रामधील बदलते संशोधन)**

**बक्षिसे :-** प्रथम (रु. ३०,०००/-), द्वितीय (रु. २०,०००/-),
तृतीय (रु. १०,०००)

**२) राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धा :- (विषय - पर्यावरण संवर्धन / अपारंपारिक ऊर्जा)**

**बक्षिसे (शालेय गट - इयत्ता ७वी ते १०वी) माध्यमिक :-** प्रथम (रु. १०,०००/-), द्वितीय (रु. ५,०००/-), तृतीय (रु. ३,०००).

**बक्षिसे (खुला गट) :-** प्रथम (रु. २५,०००/-), द्वितीय (रु. १५,०००/-), तृतीय (रु. १०,०००).

**३) राज्यस्तरीय खुली लघुपट / दर्जेदार मोबाईल क्लिप निर्मिती स्पर्धा :- (विषय - राष्ट्रनिर्मितीत महिलांचे योगदान / ऊर्जेचे अपारंपारिक स्त्रोत - नवसंकल्पना / ऊर्जा आणि मानव) (कालावधी मर्यादा - ५ मिनिटे)**

**बक्षिसे :-** प्रथम (रु. ३०,०००/-), द्वितीय (रु. २०,०००/-),
तृतीय (रु. १०,०००).

**(वरील अ अंतर्गत सर्व स्पर्धांसाठी सविस्तर माहितीपत्रक प्रसिध्द केलेले असून सर्व क्षेत्रीय कार्यालयांना पाठविण्यात आले आहे. तसेच ब अंतर्गत सर्व स्पर्धांसाठी सविस्तर माहितीपत्रक लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.)**

******

## पारस औष्णिक विद्युत केंद्राचा ६०वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न






दि. २५ ऑक्टोबर २०२१ रोजी पारस औष्णिक विद्युत केंद्राचा ६०वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न झाला, प्रभारी उप मुख्य अभियंता श्री. ज्ञानेश्वर दामोदर यांचे हस्ते प्रवेशद्वाराचे पूजन करण्यात आले. त्यावेळी उपस्थित सर्व अधीक्षक अभियंते, कार्यकारी अभियंते आणि अन्य अधिकारी, कर्मचारी व महिला कर्मचारीवृंद.

## अशय सोशल ग्रुप या पर्यावरणसंवर्धन संस्थेमार्फत गरजू महिलांना पर्यावरणपूरक मेंन्स्टुअल कपचे मोफत वाटप














महानिर्मितीचे मुख्यालय येथील कर्मचारी जितेंद्र खंडाळे, अधीक्षक अभियंता यांच्या सुविद्य पत्नी सीमा खंडाळे, यांच्या पुढाकाराने आयोजित पर्यावरणपुरक उपक्रम

## परळी औष्णिक विद्युत केंद्रात पक्षी मित्र सप्ताहानिमित्त माहितीपट संपन्न





पक्षी सप्ताह आणि डॉ. सलिम अली यांची १२५वी जयंतीचे औचित्य साधून परळी औष्णिक विद्युत केंद्र येथे मानव संसाधन विभागात उप व्यवस्थापक या पदावर कार्यरत असलेले श्री. भूषण पाठे यांनी पक्षी या विषयावर माहितीपट सादर करुन श्री. पाठे यांनी पक्ष्याचे काढलेले विविध छायाचित्रे सुध्दा माहितीसहित सादर केली,त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.



महानिर्मितीच्या मानव संसाधन विभागाकडून सी.पी.एफ. वेळापत्रक ही संगणकीय प्रणाली अद्ययावत करण्यात आली. याप्रसंगी मुख्य महाव्यवस्थापक मा.श्री. आनंद आबाराव कोंत, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.-देयके) श्री. रणधीरकुमार पाठक, महावितरणचे प्रणाली विश्लेषक श्री. लक्ष्मीनारायण, उच्चस्तर लिपिक (वि.व ले.), महावितरण सौ. प्रियंका उगले यांना शुभेच्छा देताना कार्यकारी संचालक (मा.सं.) मा.श्री. भिमाशंकर मंता



मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.श्री. संजय खंदारे यांचे अध्यक्षतेखाली संविधान दिनानिमित्त संविधान उद्देशिकाचे वाचन करण्यात आले, त्याप्रसंगी संचालक (संचलन) मा.श्री. चंद्रकांत थोटवे, संचालक (माईनिंग) मा.श्री. पुरुषोत्तम जाधव, संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (प्रकल्प) मा.श्री. व्ही. थंगपंडियन आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.





महानिर्मिती कंपनी मानव संसाधन विभाग, सांघिक कार्यालय, मुंबई येथील अधिकारी-कर्मचारी यांनी प्रोत्साहनपर म.रा.वि.मंडळ सुत्रधारी कंपनीच्या वांद्रे-कुर्ला संकुलस्थित अधिकारी वसाहतीस सदिच्छा भेट दिली व तेथील विविध कार्यालयांची व ठिकाणांची माहिती जाणून घेतली. त्याप्रसंगी श्री. आनंद आबाराव कोंत, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.), महानिर्मिती यांनी सर्व अधिकारी-कर्मचारी यांचे स्वागत करुन त्यांना मार्गदर्शन केले. सदरहू भेटीमुळे अधिकारी-कर्मचारी यांच्यात एकोपा निर्माण होऊन सांघिक कार्यालयाची भावना वाढीस लागण्यास सहकार्य झाले. त्याप्रसंगीचे हे छायाचित्र.







कोयना जल विद्युत केंद्र संकुलातील अधिकारी, कर्मचारी व कंत्राटी कर्मचारी तसेच वसाहतीतील रहिवाशी यांनी कोविड लस घेतानाची ही छायाचित्रे.





नाशिक औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. नवनाथ शिंदे यांनी वीज केंद्रातील अधिकारी, कर्मचारी व कंत्राटी कर्मचारी तसेच वसाहतीतील रहिवाश्यांना लस घेण्याचे आवाहन केले, त्यावेळी उपस्थित अधिकारी-कर्मचारी कोविड लस घेतानाची ही छायाचित्रे.

# मा. ऊर्जामंत्री ना.डॉ.श्री. नितीन राऊत यांचे शुभहस्ते चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र येथे कोळसा पाईप कन्व्हेयर प्रणाली लोकार्पण सोहळा संपन्न













मा. ऊर्जामंत्री ना.डॉ.श्री. नितीन राऊत यांचे शुभहस्ते वेस्टर्न कोलफिल्डस लि. च्या भटाडी कोळसा खाणीतून चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राला कोळसा पुरविण्यासाठी पाईप कन्व्हेयर प्रणालीचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला. त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मा.ना.श्री. विजय वडेट्टीवार, ऊर्जा राज्यमंत्री मा.ना.श्री. प्राजक्त तनपुरे, चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा मा.सौ. संध्याताई गुरनुले तर विशेष अतिथी म्हणून मा.श्री. सुरेश उर्फ बाळूभाऊ धानोरकर, मा.श्री. नागो गाणार, मा.डॉ.श्री. रामदास आंबटकर, मा.श्री. अभिजीत वंजारी, मा.सौ. प्रतिमा धानोरकर, मा.श्री. किशोर जोरगेवार तसेच सन्माननीय अतिथी म्हणून प्रधान सचिव (ऊर्जा) मा.श्री. दिनेश वाघमारे, महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.श्री. संजय खंदारे (भा.प्र.से.), चंद्रपूरचे जिल्हाधिकारी मा.श्री. अजय गुल्हाने (भा.प्र.से.), चंद्रपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा.डॉ. मिताली सेठी (भा.प्र.से.), वेस्टर्न कोलफिल्ड्स लि. चे सी.एम.डी. श्री.मनोज कुमार आणि संचालक (प्रकल्प) मा.श्री. व्ही. थंगपंडियन आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.











मा. ऊर्जामंत्री ना.डॉ.श्री. नितीन राऊत यांचे शुभहस्ते वेस्टर्न कोलफिल्डस लि. च्या भटाडी कोळसा खाणीतून चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राला कोळसा पुरविण्यासाठी पाईप कन्व्हेयर प्रणालीचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला.




महानिर्मितीला इंडियन फेडरेशन ऑफ ग्रीन एनर्जी संस्थेने सन २०२१ करिता इंडिया ग्रीन एनर्जी पुरस्काराने सन्मानित केले असून हा पुरस्कार दिनांक २० ऑक्टोबर २०२१ रोजी मा.ना.श्री. नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री यांचे हस्ते महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.श्री. संजय खंदारे ह्यांना नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात आला. त्यावेळी केंद्रीय राज्य मंत्री मा.ना.श्री. भगवंत खुबा याप्रसंगी विशेष उपस्थिती होती.

**संपादक : महेश आफळे (जनसंपर्क अधिकारी)**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :** संपादक, सृजन (महानिर्मिती), प्रकाशगड, दुसरा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१ **(खाजगी वितरणासाठी)**

**E-mail :** promahagenco@gmail.com | promahagenco1@gmail.com
**Web :** www.mahagenco.in
Printed & Published by : Shri. Mahesh Aphale of
**MAHARASHTRA STATE POWER GENERATION CO. LTD.**

**Printed At : Hema Arts**
121, Sagar, Prabhat Ind. Estate, Near Dahisar Checknaka,
Western Express Highway, Dahisar (E), Mumbai - 400068.
PH. : 28968221 & Published at Hongkong Bank Bldg., M.G. Road,
Fort, Mumbai - 400 001.
**The Company accepts no responsibility for the matter published in the journal**